REGISTERED N. No,

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक ...........................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ८१
दुसरे खेपेस .... .... ....८१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 6 APRIL 1903 NO 13

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ६ माहे एप्रिल सन १९०३ इ० अंक १३

## नोटीस.

नोटीस बेशमी भोमराज नथमल या नांवची दुकान मालक भोमराज दुकान साहू उमरे तालुके अकोट जिल्हे अकोलें यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं सन १९०० इसवी सालचे दुष्काळाचे सालीं मनला पैशाची फार अडचण पडल्यामुळें तुह्मापासोन रोख नगदी २९ रुपये घेऊन तुह्मी मजला मौजे मलकापूर प्रगणें अडगांव येथील शेत सर्व्हे नंबर ११-१२ चे शेत खरेदी करून मागितलें. त्या वेळीं तुह्मी चार लोका समक्ष वचन दिले कीं शेती माझे ताब्यांत घेऊन तुमचे रुपये फिटल्यावर तुह्मास शेती परत देऊं असे वचन दिले वरून तुह्मी मागील बाकी वगैरे काढून मजपासून १८९ रुपयाचे खरेदीखत तारीख १।१।१९०० इ० रोजीं करून घेतलें व मजला रुपये पावले बद्दल सबरजिस्टरचे समोर कोळण्यास लाविलें. या प्रमाणें खरेदी खत होऊन आज तीन वर्षे होत आली व शेताचे पिक तीन वर्षे झाले तुह्मीच खात आहा. पिकाचे मानानें पाहतां तुमचे रुपये एक वर्षांतच फिटले. हल्लीं तुह्मी वचन दिले प्रमाणें तुह्मास शेती परत मागितली असतां तुमचे मनात बेइमानकी आली असे दिसत सदर्हू शेतांत माझे पुतण्याचा ½ हिस्सा असून तोही तुह्मी कपटानें मजपासून तुह्मी लिहून घेतला आहे. मजला लिहितां वाचतां येत नसल्यामुळें आपेली मजला समजलें नाहीं. हल्लीं त्या खरेदीखतची नकल घेऊन पाहिली वरून मजला समजले परंतु हें जे तुह्मी केलं हे बरोबर केलें नाहीं. ह्मणून मुद्दाम तुह्मास नोटीस देण्यात आली आहे. तरी तुह्मी चार लोका समक्ष वचन दिले प्रमाणें माझी शेती मजला परत देऊन निकाल करावा तसे न केल्यास तुह्मी मजसी कपटानें वर्तणूक केले बद्दल तुह्मावर योग्य कोर्टात फिर्याद केली जाईल. यास्तव योग्य विचार करून निकाल करावा व नोटिसीचा जबाब आठ दिवसाचे आंत द्यावें. कळावे ता. १।४।१९०३ इ.

सही

मामुजी वा भगवानजी मोरे पाटील राहणार मलकापूर उर्फ गारमोड तालुके आकोट निशाणी खुद्द.

---

## नोटीस

नोटीस बेशमी पुंडलीक वा सखाराम पाटील साबळे राहणार मौजे गाजुर्डी नगर उर्फ पिंपळखुटे पास्ट-उमरे तालुके आकोट यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे मलकापूर तालुके आकोट येथील शेत सर्व्हे नंबर ३ याचे खातें पूर्वी तुमचे बापाचे नावाणी होते. हल्लीं तुमचेच नांवानीं आहे. यांत माझा ८४ आण्याचा हिस्सा आहे. ता भागणी रजिष्टांत दाखल असोन सदर्हू हिस्सा मी बाळकृष्ण अंताजी कुळकर्णी उमरेकर याजला गाहण वगैरे लिहून दिला आहे. व त पैसे अद्याप अदा झाले नाहींत करितां सदर्हू कुळकर्णी मजवर गाहाण मालावर हुकुमनामा मिळवून बज्यावणी करून ताब्यात घेतील व याबद्दल मी खर्चीचें विनाकारण बुडेन. एतदर्थ करितां सदर्हू हिश्याची जमीन मी त्याना ३०० रुपयास खरेदी देत असतां त्याचे ह्मणण असे कीं तुह्मी खातेदार असलेमुळें पुढें अग्रक्रयेचा दावा आणाल. ह्मणून तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी खातेदार असलमुळें मुद्दाम अगाऊ तुह्मास नोटीस दिली आहे. तरी तुह्मी ३०० रुपये रोख देऊन सदर्हू हिश्या बद्दल मजकडून खरेदी खत करून घ्यावे. या करितां सदर्हू बद्दल तुमची १९ दिवस वाट पाहून या प्रमाणें तुह्मी न केल्यास मी सदरील कुळकर्णी उमरेकर यास खरेदीखत करून देणार आहे. नंतर पुढें तुमचा दावा अग्रक्रयाबद्दल मुळीच राहणार नाहीं ह्मणून मुद्दाम तुह्मास नोटिसीनें कळविले आहे कळावे तारीख १ एप्रील सन १९०३ इ०

सही

चिनकाजी वा बापूजी पाटील मोरे मलकापूर उर्फ गारमोड पोस्ट उमरे ता. आकोट निशाणी खुद्द.

---

## नोटीस

रा. गणपतराव वल्द नारायणराव देशमुख वस्ती मौजे नारखेड पोष्ट नांदुरा तालुके मलकापूर यांस :—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं सुमारें ६ वर्षे झाले मी अज्ञान असतां माझे पालण करणार मातोश्री मक्तबाई हिनें आपणास कुलमुखत्यारपत्र दिले होते. हल्लीं मी सज्ञान १८ वर्षांच वयाचा झालो असून आपले एकंदर असलेले वर्तन अनहितकारक दिसले आहे याजकरितां तुह्मास दिलेले कुलमुखत्यारपत्र आह्मी दिलेले या नोटीसीनें रद्द करण्यांत आलें आहे. हे आपणास कळावे तारीख १ माहे एप्रिल सन १९०३ इ०

सही

यशवंतराव रूपराव देशमुख वस्ती मौजे नारखेड तालुक मलकापूर दस्तूर खुद्द.

---

## सिगारेटनीं ( विड्यांनी ) जीव वांचविला.

विड्या फार घातुक आहेत व त्यामुळें अपाय झाल्याची पुष्कळच उदाहरणें आपण नेहमीं ऐकतों. पण प्रसंगोपात्त यांनीं कित्येकांचा कसा जीव वांचविला आहे हें सांगण्याचें आज मुद्दाम योजिलें आहे.

प्रसिद्ध सिग्नार माराई नावाचा एक गवयी होता. तो विड्या पिणारा मोठा बाका होता. एकदा ता आगगाडींत बसून चालला असता त्याच्या जवळच एक वेडा गृहस्थ बसला होता. यानें एक चकचकीत सुरी काढली व तो त्या गवयाचा गळा कापण्याचा विचार करूं लागला हें पाहून त्या गवयानें आपलें विड्याचें पुडक काढून याच्यापुढें एक विडी केली, ती त्यानें घेतली व ओढली. इतक्या अवकाशांत स्टेशन आलें व लागलीच त्या वेड्यास पोलीसचे स्वाधीन केलें. बरोबरी त्या विडीनेंच जीव वाचविण्याची ही संधी दिली.

हंबर्ट बादशहा हा रोम शहरांतून गाडींत बसून फिरत जात होता. गाडींत त्यानें एक विडी पेटवली व ती तो तोंडाशीं नेणार तोंच हातांतून खालीं पडली. मग उलटून सहज पाहतो तों ती विडी एकानें उचलली तो मनुष्य अगदीं त्रस्त असावा असा दिसला. पुढें कांहीं महिन्यानीं या राजास त्रिन सहीचें पत्र आलें त्यावरून वरील गोष्टीची त्यास आठवण झाली. त्या पत्रात लिहिलें होतें कीं, मी अगदीं भिकारी होतो व वैतागून प्राणत्याग करण्याच्या विचारांत होतो, पण त दिवशींच्या तुमच्या विडीनेंच मला धीर व आशा दिली व ह्मणूनच आज मी जिवंत आहे.

फ्रेंच इतिहासकार गुझो हा एकदा बगिच्यात फिरायास गेला होता. त्याचे पाठोपाठ एक मनुष्य येत होता. तो याच्या अगदीं जवळ येऊन बसला. इतक्यात गुझो विडी पेटवून ओढूं लागला. हें पाहताच तो मनुष्य पुटपुटत ह्मणाला कीं, 'छे' हा नव्हे तो मनुष्य. तो तर विडी कधींच ओढीत नसे.' पुढें दोन तीन दिवसातच तो मनुष्य खुनाबद्दल पकडला गेला. गुझो हा विडी ओढीत नसता तर त्यानें त्याचा प्राण घेतलाच असता.

—प्रिन्स बिस्मार्क हा पारीस मधून जात असता एक फ्रेंच लोकांची टोळी ज्यानवर चाल करीत आली. बिस्मार्कनें बिलकुल न घाबरता आपली सिगारेटची डबी उघडली व एक सिगार त्यातून काढून या टोळीच्या पुढाऱ्या जवळ ह्मणाला कीं, मला आगकाडी द्याल तर मोठें आभार मानीन. हा त्याच्या मनाचा ठोकळपणा पाहून त्यास त्यानीं खुशाल जाऊं दिलें

एडविन बुथ नावाचा एक नट होता. यास असे समजलें कीं, कित्येकजण मुद्दाम आपली फटफजिती करणार आहेत. ह्मणून त्यानें पडद वर उचलला जातो न जातो अशा वेळीं दोन चार विड्याचीं बिंडलें आपल्या नोकरा करवीं या लोकांस देवविली हेतु हाच कीं, आपले काम जरा बिघडले तरी विड्यांनी परिपूर्तता करावी. आणि खरोखरीच त्याचा हेतु सिद्धीस गेला.

स्वदेश भक्त माझिनी याच्या जीवावरील संकट असेंच दूर झालें, कोणी लोक आपला खून करण्यास येणार आहेत असें समजल्या वरून त्यानें उत्तम उत्तम सिगार आणविले व तो ते ओढित मारेकऱ्यांची वाट पाहत बसला. कांहीं वेळानें ते आले, येताक्षणींच यानें उठून त्यांना या, बसा वगैरे बोलून त्यांचें आदरआतिथ्य केलें व बसल्यावर त्यास विड्या दिल्या. त्या विड्याच्या परिमळानें त्यानीं केलेला दुष्ट विचार नष्ट झाला.

पुढें माझिनी ह्मणाला अरे तुह्मी बसला काय. तुह्मी आपलें काम करा, तुह्मी मला मारणार आहातना? हे शब्द ऐकून ते खजील झाले व मुकाट्यानें घरीं परत गेले.

येणें प्रकारें त्या विड्यांची महती गायिली जात आहे. ज्या विड्यांनीं प्राण रक्षण केला त्यांस वाईट कोणी ह्मणावें! ईश्वर कोणत्या वस्तू पासून काय व कसें कार्य घडवून आणील हें कोण सांगणार!

---

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ९ शके १८२५

## संपदा.

आमचा देश संपन्न आहे, लोक आबादानीत आहेत आणि ह्मणूनच सरकारी करभार लोक पुष्कळसा सहजीं देऊं शकतात. लोकांची सुखसंपदा ही सरकारी खजिन्याच्या ओतप्रोत संपत्तीला मुख्य कारण आहे. सरकारी दृष्टीनें इंडिया देश सुखसंपन्न आहे आणि ह्मणूनच लार्ड कर्झन साहेब प्रश्न करितात कीं, श्रीमंतीच्या कसोटीला हा देश चांगला उतरतो तेव्हा हाच देश अगदीं विपन्नावस्थेत व दारिद्र्यात लोळत पडला आहे असें प्रतिपादन करणारें लोकमत आह्माला ग्राह्य करिता येत नाहीं. लोकमत कांहींही असो, हा देश श्रीमान व सधन होत चालला आहे असेंच आह्मी पुन्हा पुन्हा ह्मणतो असें लार्ड कर्झन साहेबांनीं [illegible] निस्पृहतेनें सांगितलें. लोकदृष्टी व सरकारी दृष्टी या मध्यें इतका विरोध आहे कीं एकाची जी पूर्व तीच दुसऱ्याची पश्चिम आहे. अशा विपर्यस्त दृष्टीचें संमेलन होणें संभवनीय नाहीं, ह्मणून आह्मी ही गोष्ट येथेंच सोडून दिली असती परंतु देशाच्या सांपत्तिक स्थिती संबंधानें असा मतभेद उपयोगाचा नाहीं. दोन्ही दृष्टींची ऐक्यता होईल तर ती अवश्य

पाहिजे आणि ह्मणूनच आह्मी वारंवार या संबंधानें विरोधी मतें प्रकाशित करीत असतो. सरकारी दृष्टीच चुकली आहे करांचें उत्पन्न व सांपत्तिक स्थिती यांचा अन्योन्य संबंध आहे, पण एकाचें प्रतिबिम्ब दुसऱ्याच्या आरशांत पडलें आहे असें जें सरकारास वाटतें तें चुकीचें आहे. लोक सरकारी कर देतात तो त्यांच्या जवळील पैशांतूनच देतात पण त्यांची सांपत्तिक स्थिती कळण्याला त्याच्या गरजा व त्यांच्या पाशीं शिल्लक राहिलेला पैसा यांचा मेळ कसा काय बसतो हें पाहिलें पाहिजे. लोकांच्या जवळ दौलत मोठी आहे आणि तिच्यांतून पुष्कळसा करभार वसूल केला तर कुरकुरीला ह्मणण्या सारखी जागा नाहीं. अशा ठिकाणीं सरकारी करांची रक्कम मोठी व लोकांची दौलतही मोठी असते; परंतु जेथें लोकांपासून कर पुष्कळसा घेतल्या नंतर लोकांपशीं त्यांच्या प्रपंचाच्या विस्ताराच्या मानानें शिल्लक थोडी राहते तेथें लोकांची दैना फार राहील व लोक गरिबीत हाल काढीत राहतील. तसेंच करभाराची रक्कम लहान आहे आणि दर माणशीं उत्पन्नही क्षुद्र आहे तेथें अल्पसा करभारही प्रजेला पिळून काढील. इंडियाची स्थिती अशीच कष्टमय आहे; दरिद्रावस्था सर्व प्रकारें गाजीत आहे, आणि हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं लोकांच्या गरजा अगदीं अल्प, आयुष्यभर काबाडकष्ट, राहणी मितव्ययी व अल्पसंतोषी इत्यादि दिव्य सद्गुण उपलब्ध असूनही आमच्या देशाची विपदा वाढतच आहे. अर्थात सरकारी करभार लोकांच्या ऐपती बाहेर आहेत आणि त्यांच्या वाढीवरून लोकांची श्रीमंती ध्वनित होत नसून उत्तरोत्तर होत चाललेली नादारीच दृष्टी समोर येऊं लागते. सरकारी दृष्टीला खरी लोकस्थिती कळून येईल तो सुदीन होय!

## वऱ्हाड व्यवस्था

वऱ्हाडच्या प्रश्नाचा निकाल या महिन्याच्या प्रारंभीच होईल असें वाटलें होतें पण तो प्रश्न अजून तसाच मोघमांत राहिला आहे वऱ्हाडच्या कमिशनराची जागा तूर्ततर्त भरून काढली आहे तेव्हा या प्रश्नाच्या वाटाघाटीला आणखी कांहीं काल लागेल असें अनुमान दिसतें. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं या प्रांताची वांटणी मुंबई इलाखा व मध्यप्रांत या दोहोंमध्यें होणार असल्या विषयीं वदंता होती पण ती गोष्ट होण्यासारखी दिसत नाहीं. आह्मी असें ऐकतों कीं, निरनिराळ्या सूचना स्टेट सेक्रेटरी कडे धाडण्यांत आल्या आहेत, व त्याचा खल विलायतेस होऊन नंतर काय तो अखेरचा निर्णय होईल. या प्रश्नाच्या निकालाकडे अत्रा प्रांतस्थ लोकांनें चित्त फार वेधलें आहे. आमच्या लोकाचा मनोदय असा आहे कीं या प्रांताची वांटणी किंवा इतर अदलाबदल होऊं नये, आणि याचा कारभार वर्तमान काला प्रमाणेंच बहुशः चालू राहावा. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं एखाद्या प्रांताला हा प्रांत जोडण्यांत येईल तरी देखील याचा प्रस्तुतचा स्वतंत्रपणा होईल तितका कायम ठेवण्यांत यावा अशी लोकांची मोठी मनीषा आहे. लोकांच्या तर्फेनें एक विनंतीचा अर्जही पाठविण्याचा अग्रेसरपणा उमरावतीच्या चालक मंडळींनीं पूर्वींच घेतला आहे. या अर्जाचा योग्य विचार होईल अशी लार्ड कर्झन साहेबा संबंधानें लोकांची उमेद आहे. लोकवार्तेचा ओघ असा आहे कीं, मध्यप्रांतामध्यें हा प्रांत सामील करण्यांत येईल आणि विद्यमान आमला कायम ठेवूनच सर्व कारभार चालेल. तरी पण सहा जिल्ह्यांचे चार जिल्हे करण्याची वाटाघाट अंमलांत येईल असा पुष्कळसा रंग दिसतो.

गेल्या बजेटाच्या वेळीं बोलतांना लार्ड कर्झन साहेबांनीं वऱ्हाड प्रांताच्या कौलकऱ्या विषयीं उल्लेख मुद्दाम केला आहे. या कौलपट्ट्याच्या व्यवस्थेनें निजाम सरकाराचा मोठा लाभ झाला आणि ब्रिटिश सरकाराची चांगली सोय निघाली इतकेंच नाहीं तर या बाबदींत सार्वभौम सरकारानें फार औदार्याच्या स्नेहभावाच्या शर्ती तहनाम्यात घातल्या आणि त्या निजाम सरकारांनीं आनंदानें स्वीकृत केल्या. लार्ड कर्झन साहेबांस अशा प्रकारचे उद्गार पुनः पुनः काढावे लागतात याचा हेतु इतकाच दिसतो कीं, या संबंधांतील लोकांचा गैरसमज दूर करावा पण इतिहासांतल्या कांहीं गोष्टी अशा असतात कीं कालांतरानें तत्कालीन लोक संपले ह्मणजे असले उद्गार च इतिहासाला मोठे आधारभूत होत असतात; आणि या दृष्टीनें हा कौलपट्टा ह्मणजे निजाम सरकारच्या दृढ दोस्तीचीं बंधनें होत असें पुढील पिढ्या मानीत जातील. एकंदरीनें निजाम सरकार व सार्वभौम सरकार यांच्या मधील दोस्तीची जबरदस्त शृंखला ह्मणजे हा प्रांत होय; आणि या दोस्तीच्या संवर्धना निमित्त दरसाल तोफांची सलामीही होत जाईल हें उत्तम होय.

## प्लेग

उष्णता वाढली तसा प्लेग हटत चालला आहे. ही गोष्ट निर्विवाद कीं उष्णतेचा व प्लेगाचा संबंध विरोधी दिसतो; आणि प्लेगाचा कृमि उष्ण हवेंत जगत नाहीं असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. कित्येक वैद्यांचा अभिप्राय असा पडतो कीं हवेंत प्लेगाचा कृमि उत्पन्न होतो व तो सारखा फिरत असतो, आणि त्याच्या फिरण्यांत तो ज्या माणसाच्या शरीरांत जातो त्याचें रक्त बिघडून तो मृत्युंगत होतो. या रितीनें असें व्हावयाला पाहिजे कीं, प्लेगाचे कृमी जेथें झाले आहेत तेथील सर्वच माणसास हा रोग व्हावयाला पाहिजे आणि तसा हा रोग होतो परंतु कित्येकांच्या सदृढ व मजबूत शरीरप्रकृतीपुढें या रोगाचें कांहींच चालत नाहीं. कांहीं वैद्यांचा अभिप्राय थोडासा निराळा आहे. ते ह्मणतात कीं, शरीराला अपायकारक असें विजातीय द्रव्य शरीरांत प्रथम सांचतें आणि ज्यांची राहणी, खाणें पिणें व स्थलविशिष्ट हवापाणी हीं सारखीं असतात त्यांच्यावर शरीरांतील दूषित द्रव्याचा परिणाम सारखाच होतो तेव्हांच आपण सांथीचा रोग उद्भवला असें ह्मणतो. हिंवताप, पटकी गोंवर वगैरे आजार एकदम उद्भवतात तेव्हां ही गोष्ट अनुभवास येते. तशीच गोष्ट प्लेगाची आहे. दूषित द्रव्य सांचलेल्या शरीर प्रकृतीवर साधारण हवेचा देखील परिणाम असा होतो कीं, त्या शरीरांत कृमि उत्पन्न होतात; जसे जंत, तद्वत् प्लेगाच्या कृमीची गोष्ट आहे. दुसऱ्या मताच्या डाक्टरांच्या अभिप्रायांत इतकाच विशेष कीं प्लेगाचे कृमि हवेंत नसतात तर त्या त्या वेळच्या हवेनें दूषित प्रकृतीच्या माणसावर सारखा परिणाम होऊन शरीरांत कृमि उत्पन्न होतात. हे कृमि रक्त फार लवकर दूषित करितात व मनुष्य तत्काळ मरण पावतो. ज्यांची प्रकृती अगोदरच विजातीय द्रव्यानें दूषित आहे ते चांगल्या स्वच्छ हवेंत गेले तरी तेथेंही कृमि होण्याला प्रारंभ झालेले रोगी मरतात. कांहींही मतभेद असो, साधारण गोष्ट ही खरी कीं, प्लेग उष्ण हवेंत वाढत नाहीं, व उष्ण हवेनेंच हा रोग नाहींसा होतो. या न्यायानें थंडीच्या दिवसांत प्लेगाला जोर आला पाहिजे आणि तो तसा येत असतो ही गोष्ट आतां अनुभवांतलीच आहे. पंजाबांत एका शोधकानें एक यंत्र काढलें आहे. त्याच्या योगानें उष्णता १६० अंशापर्यंत विवक्षित स्थळीं करितां येते, आणि जेथें अशी कृत्रिम उष्णता उत्पन्न करितात तेथें प्लेगाचा रोग सहसा होत नाहीं असें ह्मणतात. वरील शोधाचा अनुभव घेण्या सारखा आहे आणि आह्मी असें ह्मणतो कीं मुनसिपालिट्या व जिल्हा बोर्ड यांनीं हे यंत्र आणून एकवेळ अनुभव घेऊन पाहावा.

## मुनसिपालिटी

आकोला मुनसिपालिटीची सांपत्तिक स्थिती नीटशी नाहीं. खर्चाच्या बाबी जशा वाढत आहेत व खर्चाचीं द्वारें नविनविन निघतात त्या मानानें उत्पन्नाची बाब वाढत नाहीं; ह्मणून येथील मुनसिपालिटी पुष्कळ फिकिरींत आहे. आज वर्ष दीड वर्ष कोणते कर बसवावे या संबंधानें खल चालू आहेत. येथील मुनसिपालिटीचा कारभार उत्तमा पैकीं आहे, आणि तो या शहरची मुख्य मुख्य नागरिक मंडळी वाखाणण्या सारखा चालवितात. पण या कराच्या प्रकरणांत आमच्या मुनसिपल कारभाऱ्यांना बरोबर कांहीं युक्ति सुचत नाहीं. नवीन कर बसविण्याचें काम सोपें आहे पण लोकांच्या स्थितीला शोभतील असे कर शोधून काढणें सामान्य काम नाहीं. घरपट्टी, जनावरपट्टी, गाडीपट्टी, भंगीपट्टी इत्यादि सर्व पट्ट्या चालून आहेत. आता नवीन करांची योजना करण्याच्या खटपटींत मुनसिपालिटी आहे. मुनसिपालिटी पाशीं पैसा नसल्यामुळें पुष्कळशा महत्वाच्या व गरजेच्या गोष्टी देखील बाजूला पडल्या आहेत. अशा अडचणींत रेल्वेच्या कारखान्यातील वटलेल्या मालावर व कापसाच्या गठ्ठ्यावर कर बसविण्या विषयीं विचार चालू आहेत. दुसरा विचार जकातीचा कर बसविण्या विषयींचा आहे. कर बसविण्या संबंधानें वाटाघाटी चालू आहेत अशा या संधींत आलिशान रेसिडेंट साहेबांची मर्जी रुष्ट झाली असें दिसतें. वरिष्ठ सरकाराचें ह्मणणें कीं मुनसिपालिटी कडून नवीन करांच्या सूचना लवकर येणार नाहींत तर मुनसिपालिटीचें अधिकार काढून घेण्यांत येतील. ही दहशत लेखी हुकुमानें कळविली आहे. अशी दहशत ही प्रथमच या प्रांतांत मुनसिपालिटीवर घालण्यांत आली. ही गदा एका उत्कृष्ट कारभाराच्या मुनसिपालिटीवर आहे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. जे विद्वान व अनुभवी गृहस्थ सार्वजनिक कार्यांत आपला वेळ घालवितात त्यांच्या परोपकाराला हें बक्षीस फारच अयोग्य आहे. ते निर्लोभानें कर्तव्य ह्मणून सार्वजनिक कार्यभार शिरीं घेतात आणि त्यांच्यावर स्थानिक सरकार अशी दहशतीची सक्ती करितात हें फार वाईट होय. सरकाराला आपले विचार कळविण्याचे प्रकार नाना आहेत, परंतु मुनसिपल अधिकार काढून घेण्याची शर्त फार गैराईस्त रितीनें घातली आहे. इतक्या शर्तीवर मुनसिपल अधिकार स्थानिक स्वराज्य ह्मणून संभाळण्यापेक्षां तो सरकारच्या हवालीं करावा हा उत्तम मार्ग होय. सरकाराला तरी आपल्या हुकुमाचा कठोरपणा कळला पाहिजे.

## प्राणकला

आपण ज्यांना प्राण आहे असें ह्मणतो त्यांचा आपण वर्ग निराळा काढतो. या वर्गाला प्राणिवर्ग ह्मणतात. ज्याला प्राण नाहीं अशा पदार्थांच्या वर्गामध्यें इतर वस्तुमात्राचा व वनस्पतींचाही समावेश करितात. प्रोफेसर ज्योतिषचंद्र बोस यांनीं नवा शोध असा काढला आहे कीं प्राण हा सर्व पदार्थमात्राला आहे आणि ही गोष्ट यांनीं शास्त्रीय रितीनें सिद्ध करून दिली आहे यांनीं गेल्या २० वे तारखेला कलकत्यास एक व्याख्यान दिलें त्यांत या विषयाचा ऊहापोह केला. त्यांच्या विवेचनाचा सारांश ध्यानात धरण्यासारखा आहे. प्राणी मरतो तेव्हां आपण तो मेल्याची खूण त्याच्या नाडीमध्यें पाहतो. नाडी धांवत नाहींशी होते. तिचें चलन बंद पडतें व तेव्हांच आपण तो प्राणी मृत झाला असें समजतो. या नाडीचा ठोका हृदयाच्या ठोक्यावर अवलंबून असतो. हृदयाचे ठोके व नाडीचे ठोके सारखेच जलदी किंवा सावकाश पडतात; किंबहुना हृदयाच्या गतीनेंच नाडीला गती मिळालेली असते. हृदय बंद पडलें ह्मणजे आपोआप नाडी बंद पडते. नाडी बंद पडूं लागल्या नंतर हृदय उडत असते तिकडे आपण लक्ष देतो आणि ती धडधड बंद झाली ह्मणजे मरणकला आली असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. याही पेक्षा प्राणाची मुख्य खूण झटली ह्मणजे शरीरांतील विद्युत्प्रवाह होय. शरीराच्या भागाला जसा चिमटा घेतला ह्मणजे याचा संस्कार विद्युत्प्रवाहानें शिराच्या द्वारानें मेंदूस पोंचतो. हा प्रवाह क्लोरोफार्म देतात तेव्हां तो अशा स्थितींत येतो कीं तो अकस्मात् बंद पडतो, आणि ह्मणूनच क्लोरोफार्म दिलेला माणूस प्राण व मरण यांच्या बरोबर मध्यावर

असतो. तो प्रवाह बंद पडण्यापूर्वी पर्यंत काय ती तजवीज करावी लागते. नाहींतर, विषानें प्रवाह अजिबात बंद पडून मनुष्य मरतो.

हा विद्युत्प्रवाह माणसा प्रमाणें वनस्पती वर्गांतही आढळतो. झाडाची एक फांदी कांपली तर त्या फांदीमुळें सर्व झाडाला पंगूपणा येतो; कां कीं त्याचा तितका विद्युत्प्रवाह बंद पडतो. विद्युत्प्रवाह असा असतो कीं, वनस्पतीच्या एका शिरेची परिपुष्टी किंवा हीनता सर्व वृक्षाची परिपुष्टी किंवा हीनता आणितो. माणसाला जसे श्रम होतात व विश्रांतीनें त्याच्या श्रमाचा परिहार होतो तद्वत वनस्पतीची देखील गोष्ट आहे. क्लोरोफार्म प्रमाणें वनस्पतीवर उष्णतेचा तीव्र मारा केला तर एकदम वनस्पतीचाही प्राण जातो.

वनस्पतीवर जसा परिणाम घडतो तसाच परिणाम धातूंवर घडतो. घर्षणानें धातूला मिलहई चढते; व काहीं विषकारी द्रव्यानें धातूला मृतत्व येतें. काहीं संस्कारानें धातूमध्यें विद्युत्प्रवाह सुरू होतो आणि तो त्या धातूंच्या शिरामधून चालूं लागतो. पण जर त्या धातूवर काहीं विशिष्ट विषाचा प्रयोग केला तर हा प्रवाह बंद होऊन धातु मृत होते. प्रोफेसर बोस असेंही ह्मणतात कीं विष हें सर्वथा त्याज्य नाहीं. विषाचा उपयोग स्वल्प प्रमाणानें केला तर तो प्राणवर्धक होतो पण तेंच विष अधीक घेतलें तर तें मृत्यूला समीप करितें.

आपण ज्याला मृत्यु ह्मणतो तो वास्तविक मृत्यु नाहीं. मृत्यु ह्मणजे परमाणू मधील विद्युत्प्रवाहाची स्थगिता होय. काहीं काळ पर्यंत परमाणू अशा संबंधात येतात कीं त्याच्या परस्परामध्यें प्राणदर्शक विद्युत्प्रवाह चालत नाहीं. ही गोष्ट जर खरी आहे आणि वस्तुमात्रांत प्राण आहे तर प्राणदर्शक विद्युत्प्रवाह पुनः सुरू करण्याची गोष्ट संभवनीय आहे. सृष्टीचा नियम एकच दिसतो कीं प्राण सर्व पदार्थमात्रांत आहे पण त्याची घटना ह्मणजे पदार्थांच्या अणूमधून चालूं असलेला विद्युत्प्रवाह होय. तो बंद पडला ह्मणजे आपण मृत्यु ह्मणतो. मृत्यूची अवस्था अल्पकालीन असते; आणि तो काळ संपला ह्मणजे परिमाणू मधील जीवनकला जी विद्युत् ती चालूं लागते. या शास्त्रीय गोष्टी सांगण्याचा हेतु इतकाच कीं नवीन शोधाकडे वाचकवर्गांची दृष्टी फिरती राहावी.

The Berar Samachar

MONDAY APRIL 6 1903

Our local municipality is on the horns of a financial dilemma. The city-fathers are intent upon devising a new scheme of taxation in order to meet the growing expenditure. There is hardly an equilibrium between finances and expenditure There are two proposals before the Committee. The first is to impose a tax on the quantity of cotton ginned and the number of bales pressed in the factories of the town. The second proposal refers to the imposition of an *octroi* duty. The cost of collecting this is much more than any other tax that has been yet levied. This tax is proposed as an alternative in case the local government do not view with approval the first proposal. These proposals are in the process of being submitted to the superior authorities. But in the meanwhile the Hon'ble the Resident gets impatient of the delay in the submission of the above proposals and has issued a strict warning that in case of a further procrastination in this connection the Government will have to exercise their powers of suspending the local body. The penalty of suspension is rather too much for the dignity and the good name of the Akola municipality. We hope that the matters will find an easy solution with satisfaction to both the contending parties. In this connection we wish to bring to the notice of the Municipal Committee the main principles on which the Government of India will be prepared to sanction the imposition of the octroi duty. The principles are not new but will bear a repetition in the following quotation of the portion of the answer which Lord Curzon gave the other day to the memorial of the Allhabad Municipality.

"As regards the principles that regulate the policy of the Government in respect of octroi, a reply to a municipal adress is perhaps hardly the place in which I should be expected to state or vindicate them at legngth. Broadly speaking one may say that there are certain articles, such as salt, opium, mineral oil, and exciseable articles of which the State must reserve to itself the taxable monopoly and cannot surrender it to subordinate bodies. There is a wider class of articles, partly imported by sea and partly indigenous, upon which a limited octroi is permitted on condition that both classes of article are similarly treated. The one danger that the Government have to be on their guard against is, lest a form of a taxation devised and defended in purely local interest and fairly applicable therefore to articles of local consumption should be converted into a transit duty on trade in general. This is not admissible since it would mean using a local benefit to inflict a public injury. Within the limits of these principles the Government of India have been liberal in granting exemptions and exceptions in the favour of cities whose incomes it has been impossible to recruit from other resources."

—:0:—

Professor J. C. Bose is the most renowned scientist of India. He has set before himself the problem of Life and Death. He has carried his nvestigations far into the regions of actual experiments and has made an excellent attempt to prove how life ceases to exist and the phenomenon of death supervenes over the animal as well as the vegetable world. His observations lead him further on to conclude that there is life in the metalic substances. The symbol of life is the electric pulse that beats through all organic and inorganic matter. He arrives at the theory that death is merely a temperory arrest of molecular forces. In his recent speech at Calcutta Professor Bose thus puts forth the final result of his latest discovery of the 'Response of matter."

"The animal, the plant and the metal had now been subjected to the same stimuli and had all of them given the same reply—they respond in an identical manner. To some minds this might come as a rude shock. There are unfortunately some types of mind which think that reverence can only go hand in hand with ignorance. But these forget that. He who surrounded us with the limitless mystery of things—this ineffable wonder that lies hidden in the microcosm of the dust particle, imprisoning in its atomic form all the mysteries of the cosmos has implanted in us also the desire to know and understand. Seeing that at one time the earth was in a molten state, the conclusion cannot be avoided that living substances have been evolved from substances that are customarily termed lifeless. The Lecturer had shown that properties supposed to be exclusively confined to life, have their beginnings in non-life. The dust-particle and the earth, like the animal and the plant are instinct with sensibility. There is thus no abrupt break of continuity in Nature. We are thus thrilled with the conviction that the world we live in, is not the theatre of caprice and chance, but that one mighty unchangeable law binds together all."

## वऱ्हाडवृत्त

हवामान– उष्णतेचें मान वाढूं लागलें आहे. उत्तरोत्तर उन्हाळा अधिकाधीक होत असून त्या मानानें प्लेगाचा रोगही हटत चालला आहे. गोंवर, हिंवताप, वगैरे मामुली आजार जोरावर आहेत.

मे. ए. इलियट साहेब आफिशिएटींग कमिशनर यांनीं गेल्या मंगळवारीं आपल्या जागेचा चार्ज मे. हेअर साहेब यास दिला. याची सरकारी चाकरी त्या दिवशीं पुरी झाली. वऱ्हाडातील हे फार जुने अधिकारी होते. गेल्या बुधवारीं मेल ट्रेनीनें साहेब बहादूर मुंबईकडे रवाना झाले.

उमरावतीच्या नागरिकांनीं मे० इलियट साहेबास गेल्या मंगळवारीं रात्रौं एक उपहाराची मेजवानी दिली. समारंभ टौनहॉल मध्यें झाला. मे० इलियट साहेब हे फार सुप्रसन्न दिसले. नाटकाच्या प्रयोगाचें थोडेंसें दर्शन झालें. व इतर करमणुकीच्या गोष्टी पुष्कळशा झाल्या.

मे० इलियट साहेब हे बुधवारीं जात असतां वऱ्हाडातील ठळक ठळक रेल्वे स्टेशनावर सरकारी व खानगी गृहस्थानीं त्यांचा निरोप मोठ्या आदरसत्कारानें घेतला.

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं उमरावतीचे वकील मि. लीच हे गेल्या गुरुवारीं एकाएकीं काळजाच्या रोगानें मरण पावले. हे चांगले वक्ते असून चतुर होते. त्यांच्या सन्मानार्थ उमरावतीचीं कोर्टें बंद ठेवण्यात आलीं होतीं.

वैदर्भकार लिहितात कीं रा. रा. रावराव बापूजी तकी तहशिलदार यांची बदली पंढरकवड्यास न होता दारव्हा तहशिलीवर झाली आहे.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर तहशिलदार हे येथून गेल्या शुक्रवारीं दारव्हा तहशिलीचा चार्ज घेण्यासाठीं रवाना झाले, पण वास्तविक त्यांची बदली अन्यत्र कोठें झाली असावी असें वरील बातमी सांगते. राजश्री बाबा साहेब हे फार सुशील व प्रेमळ अंतःकरणाचे गृहस्थ आहेत. सरकारी काम बागदीं न्यायानें व चोखपणानें होत असून त्यांचा अधिकार असा कोणालाच भासला नाहीं आणि त्यांची ती आनंदी व दयार्द्र मुद्रा अधिकाराच्या कठिणपणालाही मृदुत्व आणिते. यांच्या बदलीमुळें येथील लोकास विशेषच वाईट वाटलें.

मि. सिम्पसन साहेब हे उमरावतीच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं झाले.

उमरावतीस गेल्या वर्षप्रतिपदेला 'अनाथालया' ची संस्थापना झाली. त्या कार्यासाठीं येथून रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे गेले होते. सध्या अष्टविध मंत्रिमंडळ नेमण्यांत आलें आहे. या उपक्रमा पुढील कृतीची उभारणी काय होईल ती खरी.

वाशिमचा बातमीदार कळवितो कीं, प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानू यांची मनोहर व सुश्राव्य व्याख्यानें ऐकून तेथील लोक फार आनंदित झाले आहेत. हा आनंद वर्गणीचे आंकडे सढळपणानें टाकवील व राजश्री भानू यांच्या पुण्याकडील शिक्षण संस्थांस द्रव्यद्वारा चांगली मदत होईल अशी आशा आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असि. कमिशनर व सुपरिटेंडेंट रेसिडेन्सी बझार यास तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली व त्याचें काम रावसाहेब गणपत बाबाजी सहस्रबुद्धे यांच्याकडे सोंपविलें.

रा. रा. रामचंद्र अंबादास नायब तहशिलदार खामगाव यांनीं पेनशन घेतल्यामुळें रा. रा. लक्ष्मणराव बी. ए यांस वर्ग १ व रा. रा. नरहर अमृत यांस वर्ग २ ची नायब तहशिलदारी देण्यांत आली.

## नोटीस.

बेशमी सैतान वल्लद रावजी पाटील राहणार हिंगणें (दादगांव) तालुका खामगाव जिल्हा आकोला यांस:–

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख ३०।७।९८ रोजीं तुह्मी १०० रुपयांच्या मोबदल्यात आपली शेती मौजे हिंगणे येथील सर्व्हे नंबर १ एकर गुंठे ९८३९ आकार रुपये ८८८ यातील निम्मे दक्षिण बाजूचा हिस्सा झाडा सुद्धां मजवजळ ताबेगहाण ठेविली. तुह्मी तीच शेती भाडेपट्यानें आजपर्यंत वाहिली परंतु दरसाल स्वाधिनाची रक्कम देण्याच्या वेळीं काहीं तरी अडचण दाखवून मला सांगत गेला कीं ही भाडेपट्याची रक्कम गहाणात मजरा न जाता मी माझ्याच कडे लावून घेतो. येणें प्रमाणें तुमच्या गरिबी कडे लक्ष देऊन गहाणकर्म तसेंच राहूं दिलें. व्याज चढत आहे आणि तुमच्या हातून फेड कांहीं होऊं शकत नाहीं. तुह्मी १३१२ फसलीचा भाडेपट्टा देखील लिहून दिला नाहीं. व शेत खालीं करून मागितलें असता शेतही तुह्मी माझ्या स्वाली केलें नाहीं. सरकारात फिर्याद करून शेत ताब्यांत घेईन पण हा विनकारण खर्च तुह्मावर करूं नये ह्मणून ही नोटिस दिली आहे. आठ दिवसाच्या आंत शेत परत करावें. शेताची किंमतही माझ्या कर्जाच्या रकमेत होऊन चुकली आहे. कळावें. तारीख १ एप्रील १९०३ इ.

(सही)

परशराम वा। कृष्णाजी पाटील
राहणार नायगांव परगणे चांदूर
ता. मलकापूर द. सु.

**गुलामांचा व्यापार—** सगळ्या देशां पेक्षां चीन देशांत गुलामांचा व्यापार सध्यां जारी आहे. त्या देशांतील चाळीस कोट लोकांपैकीं एक कोट गुलाम आहेत! खाऊन पिऊन सुखी असलेल्या गृहस्थाकडे एक तरी गुलाम असावयाचाच! तेथील गृहस्थांची श्रीमंती पहावयाची ह्मणजे त्याच्या घरांत किती गुलाम आहेत तें मोजावयाचें! तेथें गुलामांनां फारशी किंमत पडत नाहीं. मोठ्या पुरुषाला चाळीस रुपये व स्त्रीला पन्नास अगर साठ रुपये ह्मणजे शिकस्त!

**संत्र्याची साल सबंध कशी काढावी** एक संत्रा घेऊन प्रथम त्याचे देंठाजवळची एक लहानशी साली ची चकती चाकूनें काढावी नंतर तो थोडा वेळ विस्तवापाशीं ठेवावा, ह्मणजे त्याची साल कापल्यापासून सबंध सुटून येते. नंतर त्यांतील एक एक कापटी बाहेर काढावी, ह्मणजे ती साल सबंध राहील.

**वेडाची लहर—** न्यूयार्क येथील एका मुलास रात्रंदिवस एक सारखी शीळ घालण्याचें वेड लागलें आहे. वेड्या मनुष्याच्या मोठ्या गमतीच्या चेष्टा असतात, त्याचें एक पुस्तक केल्यास फार मनोरंजक होईल.

**लग्नाबद्दल विचार—** अमेरिकेंतील लोक वाढत्या लोकसंख्येस आळा घालण्यासाठीं लग्नें न करण्याचा विचार करीत आहेत. पण फ्रान्सांतील लोक जे अविवाहित राहतील त्यांजवर जास्त कर बसविणार आहेत; ज्यास मुलेंबाळें होणार नाहींत त्यांच्यावरहि जास्त कर आहे, परंतु ज्यांची मुलामुलींची अलोट संपत्ती असेल त्यास बक्षिसें देण्यात येतील. येणें प्रकारें दोन उलट प्रयत्न सुरू आहेत.

**साहेबी टोपी घालणारास ताकीद—** अलिकडे पुष्कळ नेटिव लोकास साहेब लोकांच्या टोप्या घालून मोठमोठ्या ठिकाणीं फिरण्याची पद्धत आवडूं लागली आहे. नुकतेच सरवाक येथील राजानें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं, अशी टोपी वापरणारे नेटिव लोकांनीं कोणत्याही कचेरींत अगर इमारतींत शिरतांना आपली साहेबी टोपी काढून घेतली पाहिजे. तसें न केल्यास तो अपराधी गणला जाईल.

**गोडे बटाट्यांची साखर—** फोर्मोसा बेटांत गोडे बटाट्याची लागवड करून त्यापासून साखर तयार करण्याचा उद्योग निघाला आहे. या उद्योगापासून चांगला फायदा आढळून आला आहे. एक एकर जमिनींत ४०००० पौंड गोडे बटाटे निघतात व यापासून एक हजार पौंड साखर तयार होते. हे बटाटे तयार करण्यास खर्चही बेताचाच येतो असें ह्मणतात.

**सूचना—** ज्यांचा प्राप्तीवरील कर माफ झाला असेल त्यांनीं तो आणखी एक महिनापर्यंतचा माफ झाला नाहीं असें समजून तो सरकारकडे भरावा व अशा तऱ्हेनें जी मोठी रकम तयार होईल तींतून ना० लॉर्ड कर्झन यांचा एक भव्य पुतळा तयार करवून तो मुंबईवारख्या प्रमुख शहरीं या गोष्टीच्या स्मरणार्थ उभारण्यांत यावा असें एकानें मुद्दाम सुचविलें आहे.

**लोकगणनेंत सुधारणा—** काहीं लोक गणती करणारांनीं गर्भांतील लेकरांचीहि गणना केली ह्मणतात, आतां कित्येक ठिकाणीं मुलाबद्दल मुली व मुलीबद्दल मुलगे झाले व कित्येकांस जुळीहि झालीं व कित्येकांचा गर्भपातहि झाला वगैरे ज्या चुका झाल्या त्या दुरुस्त कशा कराव्या ह्मणून काहींनीं शंका घेतली आहे.

**ज्वालामुखी—** युरोप व अमेरिका या खंडांतील ज्वालामुखी पुन्हां क्षुब्ध झाल्या आहेत व आपल्या मुखांतून निखारे, दगड, माती यांचा वर्षाव करीत आहेत.

**प्लेग देवता—** अलीकडे पुष्कळ ठिकाणीं प्लेग देवता कित्येक स्त्रियांचे अंगांत संचार करूं लागल्या आहेत व त्यामुळें त्या बायांना आपलें स्तोम माजविण्याची युक्ती सांपडली आहे.

**प्लेगाची लस—** टोंचलेला मनुष्य सुरक्षित राहील, परंतु त्याच्या शरिरांतील प्लेगाचें बीज इतरास फार घातुक होण्याचा फार संभव आहे असें ह्मणतात. लोकांनीं खबरदारी घ्यावी हें उत्तम.

**तुफान पाऊस व गारा—** बारिसाळ प्रांतांतील कमरकाटी गांवीं फाल्गुन वद्य ७ रोजीं एकाएकी पाऊस येऊन गारांचा इतका वर्षाव झाला कीं कित्येक लोक जखमी झाले व मेले; काहींचीं डोकीं फुटलीं. एका तळ्यांतील मासे मरून गेले! हा वर्षाव वीस मिनिटें झाला. त्यानंतर बाहेर येऊन पाहतां अर्ध्या मणाची एक व ३० शेर वजनाची एक अशा दोन गारा पडलेल्या दिसल्या, असें ह्मणतात.

**मातीचे पैसे करणारी बाई—** १५ दिवसाखालीं कलकत्त्याच्या चितपूर रस्त्यांत संध्याकाळीं ४॥ - ५ चे दरम्यान एक चमत्कार घडला. एक विलक्षण दिसणारी, वल्कलें नेसलेली बाई डाव्या हातांतील माती उजव्या हातांत घेऊन ती मुठ उघडी कीं त्याचे सर्व पैसे होत व ते पैसे ती रस्त्यांतील गरीब लोकांत उधळी. असा प्रकार बराच वेळ चालला होता. पुढें ती ट्रामवेंत बसून निघाली, तरी पैसे मागत लोक तिजबरोबर धांवत येऊं लागले! ट्रामवेंत बसलेल्या सभ्य लोकांसही ती, पैसे हवे कां, ह्मणून विचारीत होती! शेवटीं ती बीहान गार्डन जवळ उतरली व तेथेंही पुनः पैसे उधळूं लागताच पुनः गर्दी झाली. ही बाई माती चे पैसे कसे करते हें समजत नाहीं. ही एक सरकारास अपोल व जिवंत टांकसाळच सांपडली ह्मणावयाची.

**फार पोक्त विचार—** श्री. महाराज गायकवाड सरकार ह्मणाले— 'टोस्ट घेणें व जेवल्यानंतर भाषण करणें हे पाश्चिमात्य प्रकार आहेत. सांप्रत याचें अनुकरण बरेंच होऊं लागलें आहे. आपले समाजाचा, देशाचे स्थितीचा व काळाचा सारासार विचार करून जेवढें दुसऱ्याचें घेण्यासारखें असेल तेवढेंच घ्यावें. सारासार विचारा वांचून सुधारणा होणें इष्ट नाहीं.

आपल्या देशांत शांतता असल्यामुळें शिपाईबाण्याची अवश्यकता वाटत नाहीं, तरी तो हमेशा ठेवली पाहिजे. लष्करी अंमलदारानें मालकाकरितां प्राणही खर्चण्यास तयार असलें पाहिजे, देशकार्य साधण्यासाठीं लष्करचें लष्कर खाटकाप्रमाणें कापून जय मिळवावा लागतो. ज्या समाजांत असले लोक नाहींत तें राष्ट्र जागृत नाहीं.'

**जिवाची भिती—** तुर्कस्तानच्या सुलतानास आपल्या जिवाची फार भिती वाटते; तो आपल्या अंगरख्याच्या खिशांत नेहमीं एक भरलेलें पिस्तुल ठेवतो; कोणी भेटावयास आलें ह्मणजे त्याचा उजवा हात सारखा पिस्तुलाच्या खिशांत असतो. सुलतानास रात्रीचा अंधार व सामसूम यांची फार भीति वाटते; आपल्या महालांत चोहोंकडे दिव्यांचा लखलखाट केल्यावांचून व महालाचे बाहेर अंगणांत शिपायांची रात्रभर सारखी कवाईत व बँड वाजविणें चालू असल्याशिवाय त्यास झोंपच येत नाहीं.

**विचित्र घड्याळ—** नेमक्या वेळीं आपल्या बोटाला एक टांचणी टोंचून मनुष्यास सावध करणारें असें बोटांतील आंगठीवर बसवावयाचें घड्याळ, एका अमेरिकन मनुष्यानें नुकतेंच तयार केलें आहे.

**अमोलिक शोध—** प्रोफेसर पिस्टीन नांवाच्या एका फ्रेंच विद्वान शोधकानें जन्मांधांना सृष्टीचें अवलोकन करितां येईल, असें एक यंत्र तयार केलें आहे, व त्याचा अनुभव दुसऱ्या एका डाक्तराला त्यानें दाखविला आहे असें समजतें. हें खरें असल्यास, पाश्चात्यांच्या शोधकतेची फारच तारीफ केली पाहिजे.

**खरें वक्तृत्व—** आपल्या संभाषणानें दुसऱ्याचीं मनें आतुर करून आकर्षून घेणें, आपल्या प्रमाणेंच त्यांस विचार करण्यास लावणें, आपल्या सारखीच दृष्टी त्यास देणें, आणि आपल्या मता प्रमाणें त्यांचीं मतें करून सोडणें— याचें नांव वक्तृत्व आणि हीच खरी वक्त्याची ईश्वरी शक्ति.

**गमतीचा सिद्धांत—** अनुभवानें व परीक्षणानें असें ठरतें कीं, बहुतेक नाठभाठ वक्ते हे बोलण्यास उठल्यापासून तों बोलणें संपर्यंत भीतीनें थरथर कांपतात, कित्येकांचे हातपाय लटपटूं लागतात, कित्येकांचे ओंठ व कंठ कोरडा पडतो कित्येकांस तर थंडीनें कुडकुडल्या प्रमाणें हुडहुडीहि भरते. आणि असें हि ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, असें कंपायमान झाल्याखेरीज चांगला वक्ताच होऊं शकत नाहीं.

**जांभई दिल्याबद्दल शिक्षा—** पार्लमेंटचे एका सभासदानें सभेंत मोठ्यानें जांभई दिली व तीही सभासदांना त्रास होण्याकरितां दिली ह्मणून त्यास १० शिलींग दंड व १५ दिवसांची सक्त कैदेची शिक्षा झाली.

**लग्नाची चाल—** फिलिपाईन बेटांत निग्रिटोजन लोकांत जेव्हां लग्न होतें, तेव्हां त्यांच्या जातीचे सर्व लोक एका ठिकाणीं जमतात. नंतर ते त्या नवराबायकोला दोन जवळ जवळ वाढलेल्या झाडांच्या एक एका फांदीवर बसवितात; नंतर त्या जमलेल्या मंडळींत जे कोणी शिष्ट ह्मणविणारे लोक असतात, ते या दोन फांद्या त्या दंपत्याचीं डोकीं एकमेकाला लागेपर्यंत लववितात. ह्या डोक्याचा स्पर्श झाला, ह्मणजे तें लग्न कायदेशीर होतें! नंतर मग सर्व लग्नसमारंभ होतो!

**आणखी पांच वर्षे—** लॉर्ड कर्झनसाहेबांची मुदत आणखी पांच वर्षे वाढविण्याचें ठरल्यासारखेंच आहे अशी दाट वदंता आहे.

**बायकांचा दुष्काळ—** ट्रान्सवालांत सध्या बायकांचा फार तोटा आहे. ह्मणून युरोपांतून तिकडे जाणाऱ्या प्रत्येक इंग्रज स्त्रीस तेथील सरकार पांच पौंड खर्च देणार असून यासाठीं एकंदर दरसाल १५००० पौंड तें खर्च करणार आहे.

**शतायुषी लोक—** नुकत्याच झालेल्या खानेसुमारीवरून अमेरिकेंतील युनायटेड स्टेटमध्यें ३४३६ शतायुषी माणसें असल्याचें आढळून आलें आहे. त्यांत ८६ माणसें १२० वर्षांवरील वयाचीं होतीं व १५ मनुष्यें १३० वर्षांवरील वयाचीं होतीं. एक रेड इंडियन १५० वर्षांचा, एक निग्रो १४५ वर्षांचा आणि एक यहुदीण १३७ वर्षांची होती असें प्रसिद्ध झालें आहे.

**नाकें मुरडतील—** हिंदुस्थानासाठीं एडवर्ड राजाच्या मुखवट्याचा जो नवा रुपया निघाला आहे त्याबद्दल इंग्लंडांतील एक्सप्रेस नांवाच्या वर्तमानपत्रांत थोडक्यांत अशी टीका आली आहे कीं, हिंदुस्थानांत बोडक्यानें हिंडणें हें अशुभ समजतात. तेव्हां राजाचा मुखवटा बिन मुकुटाचा टाकल्यास तिकडील लोकांस मुळींच पसंत पडावयाचा नाहीं. शिवाय तरवारीनें उडविल्या प्रमाणें तें डोकें दिसतें. राजासंबंधानें पूज्य बुद्धि उत्पन्न होण्याला ज्या गोष्टींची अवश्यकता लागते त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें चांगलें नाहीं. तिकिटावरील ठसाही अशाच गासल्याचा आहे.

**चमत्कार—** तुळजापुरास शतचंडी यज्ञ झाला. जलपूजा सिद्धेश्वर कल्लोळांत न होतां मुद्गलेश्वर कल्लोळांत झाली यामुळें देवतेस राग येऊन कीं काय कोण जाणें तेथील पाणी पांढरें शुभ्र झालें आहे. हा चमत्कार पाहण्यास पुष्कळ लोक जात आहेत.

**डोक्यानें चालला—** पॅरीस येथील एक पंचविशीच्या वयाचा मनुष्य डोक्यानें चालण्याचें काम फार चांगलें करितो. दोन मिनिटें डोक्यावर उभा राहून उड्या मारीत मारीत जातो व दोन मिनिटें विसावा घेऊन पुन्हा उड्या मारितो. या त्याच्या विलक्षण कसरतीचें सर्वांस अत्यंत आश्चर्य वाटतें.

**मुखावाटें शौच—** एका मनुष्यास फेंफरें येत असतांना दवाखान्यांत आणला. त्याच्या लाळेला मलाची घाण येत होती. त्यावरून शोध करतां त्या मनुष्यानें सांगितलें कीं गेल्या दोन वर्षांपासून मला शौच नेहमींचे द्वारानें न होतां मुखावाटें रोज एकदां सायंकाळीं साहा वाजतां होतो; व पुढें शोध ठेवतां त्याचे ह्मणण्याची सत्यता दिसून आली. एखादे वेळीं शौच होतांना त्याजला काहींच श्रम होत नसत. परंतु काहीं वेळा पाठींत दुखून किंचित् ओकारे येऊन मळाचें उत्सर्जन होत असे, व त्याचे आगोदर काहां तास पोट फुगून घट्ट होत असे, परंतु मुखावाटें शौचास साफ झाल्यावर हीं लक्षणें नाहींशीं होत. पोटांत वरच्या व उजव बाजूस मार लागल्याची हकीकत मिळाली. ह्या शिवाय पोटांत अवळू किंवा कठिणपणा वगैरे काहींच दिसून आला नाहीं.

REGISTERED N. No. 4

बाहिरगांवीं टपालहाशिलासह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक ................ ८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ८१
दुसरे खेपेस .... ........ ८१

Mofussil ... ... ... 2 (with postage)
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 8 as
Repetition Per line ... 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 13 APRIL 1903 NO 14

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १३ माहे एप्रिल सन १९०३ इ० अंक १४

### नोटीस

वेशमी किसनलाल संतुकराम साहू खत्री दुकान आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटीस देण्यांत येते कीं तुमच्या दुकानी आमची अडत पुष्कळ वर्षांपासून आहे. तुमच्या दुकानची मला रकम रुपये २२६ म्हणजे १९०+६०+१६ मिळून देणें आहे पण थोडे दिवसपूर्वी मी तुमच्या दुकानी सहजीं आलों होतों तर तुमचे बंधू नारायणराव हे म्हणाले कीं रकम तुम्हाकडे पुष्कळ मोठी निघते. परंतु मला तर वरील रुपया शिवाय कांहीं देणें नाहीं. तुमच्या दुकानीं हिशोबांत कांहीं खोटेपणा तुमच्या वही लिहिणारानें केला आहे म्हणून कर्णोपकर्णी व दुसऱ्या कांहीं कारणावरून कळतें तर विनंती कीं माझ्या खात्याचा पुरा हिशोब पहावा आणि ज्यानें लबाडी केली असेल त्याच्या पासून आपली रकम भरून घ्यावी. सूचनार्थ ही नोटीस दिली आहे; तर आठ दिवसांत आमच्या खात्यांतील चुकी दुरुस्त करावी म्हणजे सर्व बाकी चुकती करून देतों. असें न केल्यास या नोटिशिच्या खर्चासुद्धां सर्व नुकसानी तुमच्या अंगावर पडेल. कळावें, ही विनंती. तारीख ६।४।१९०३ इ०

सही

वामनराव पाहाडसिंग देशमुख राहणार बोरगांव मंजू ता. आकोला.

---

### नोटीस

ए० खुशाल वल्द रतनाजी बोडसर कुणबी राहणार कुऱ्हाड तालुके मुर्तिजापूर व पोस्ट मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही मला लग्न झाल्यापासून बागवीत नाहीं. तुमच्या घरीं यावें तर मारठोक करिता व माझे कडे ढुंकूनसुद्धां पाहात नाहीं यावरून तुम्हाला माझी गरज नाहीं असें वाटतें. ६ वर्षांपासून मी माझ्या भावाजवळ खाऊन पिऊन पडली आहे. तो खर्च सुमारें २०० रुपये अजवरचा सुद्धा झाला आहे. तो खर्च द्यावा व मला घेऊन जावें नाहीं तर १५ दिवसांत तुम्ही यथें येऊन चार चौघा समक्ष फारकी लिहून द्यावी. तसे तुम्ही न केल्यास, तुम्हीच फारकी समजून दुसरा घरठाव करीन कळावें तारीख ६।४।१९०३ इ०

सही

भेवंतो मर्द खुशाल निशानी हातची बागडी हल्लीं मुक्काम सोनाळ पोस्ट मंगरूळपीर

—:0:—

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य १ शके १८२५

सूर्य हा प्राणदाता आहे. सर्व प्राणांचें मुळबीज सूर्यकिरणांतच आहे. किरण याचा अर्थ शास्त्रीय दृष्ट्या उष्णता असाच आहे. उष्णतेनें सर्व घाणी नाहींतशा होतात आणि याच धोरणानें मोकळ्या हवेंत जाऊन राहावें व सूर्य किरणांचा पूर्णपणें उपभोग घ्यावा, म्हणजे प्लेगाची बाधा होण्याचा संभव फार कमी. याच्या उलट पक्षीं शहरें म्हणजे लोकवस्तीच्या मुताऱ्या, मोऱ्या, शेतखाने, इत्यादि घाणीच्या खाणी असतात. तेथें दुर्गंधी द्रव्यें सांडून वर्षांचीं वर्षें लोटलीं असतात. अशा दुर्गंधी सूर्यकिरण नाहींतशा करितात. पण जेथें या दुर्गंधी जमिनींत मुरतात, ओलसर जागा राहून खोलवर जमीन कसरहित होते तेथें कोणताही रोग फार लवकर वाढतो. म्हणूनच प्लेगाच्या सांथींत घाणीच्या ओलसर जागा होतां होईल तितक्या त्याज्य कराव्यात. ज्या शहरीं मोऱ्या नाहींत किंवा घाण वाहून जात नाहीं तेथें हे सांथीचे रोग अधिक वाढतात असा पुणें, मुंबई, वगैरे कडील अनुभव आहे.

साधारण गोष्टी अशा सूचव्या तशा त्या आम्ही लिहिल्या आहेत आणि वैद्यकशास्त्रांतील अनभिज्ञ लोकांच्या दृष्टीला या अज्ञात दिसतात. वरील विवरणावरून प्लेगा वगैरे औषधाच्या कांहीं गोष्टी सहजींच समजतील. कृमि बाहेरून जावो, किंवा कृमि शरीरांत उत्पन्न होवो, हें खरें कीं, शरीराचें संशोधन झालें पाहिजे. संशोधन मलमूत्रद्वारा होतें तसेंच त्वचेच्या घर्मद्वारा होतें. संशोधनाच्या या गोष्टी चालू राहतील असाच उपाय योजला पाहिजे. जेथें गांठी होतात तेथें गांठी वाहतील व दूषित द्रव्य बाहेर पडेल असा उपाय बरा. जेथें गांठी होत नाहींत तेथें सर्व शरीर व्यापणारीं दूषित द्रव्यें त्वचेच्या रंध्रांतून घर्मद्वारा बाहेर पाडलीं पाहिजेत. घर्म आणणारे उपाय अवश्य करावेत. डाक्टर व वैद्य उपचार करीत असतातच पण वरील धोरणानें उपाय होतील अशा विषयीं मुख्यतः लक्ष ठेविलें पाहिजे.

---

सध्यां पुण्यास चालू असलेल्या टिळक प्रकरणांत साक्षीदार रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांजवर वारंट निघालें होतें. या वारंटा विरुद्ध मुंबई हायकोर्टाकडे अपिल करण्यांत आलें होतें त्याचा निकाल नुकताच असा बाहेर आला आहे. कीं पुण्याच्या माजिस्ट्रेटांनीं काढलेलें साक्षीचें वारंट बजवावें किंवा बजावूं नये या प्रश्नाचा निकाल वऱ्हाडच्या हायकोर्टानें करावा. मुंबई हायकोर्टानें हा निकाल स्वतांच्या अंगा बाहेर टाकला आहे. आतां आमच्या स्थानिक हायकोर्टांत या वारंट प्रकरणाचा निकाल काय होतो हें पहाण्याचीच संधी आली आहे. वरील प्रश्नाच्या पोटांत मुख्य प्रश्न हा आहे कीं, वऱ्हाड प्रांत हा इंग्रजी मुलूख आहे कां मोगलाई मुलूख आहे. आणि अशा संशयाची बाधा होण्याचें कारण हा इतकीं वर्षें असलेला मुलूख अमानी प्रांत नुकताच चिरंतनच्या कौलपट्ट्यानें इंग्रज सरकारास मिळाला आहे. आणि या पट्ट्याचा सार्वत्रिक असा अर्थ करितात कीं, जणू काय हा प्रांत खालसाच झाला व पूर्णपणें इंग्रजींत गेला. पण हा लोकांचा झालेला समज अगदीं चुकीचा आहे. खरें पाहतां अशी शंका घेण्यासच कांहीं जागा नाहीं. हा प्रांत कौलपट्ट्यानें सरकारास मिळाला आहे या वरून हें स्पष्टच होत आहे कीं, इंग्रज सरकार हे पट्टेदार आहेत व खरे मालक हैदराबाद सरकारच आहे. ही गोष्ट खरी आहे कीं ह्या मुलुखावर आतां सर्व सत्ता इंग्रजांची राहील, तरी पण ह्या प्रांताचें स्वामित्व मात्र निजाम सरकाराकडेच आहे. मराठेशाहीचे तक्ताचा मान श्रीशिवाजीच्या वंशजांचा होता व ते पेशव्यांच्या कडून आपला राज्यकारभार करवून घेत असत. पण कालेंकरून ते पेशवे प्रबल होऊन मुख्य मालकास विचारीतनासे झाले व त्यांनीं स्वतंत्र रीतीनेंच कारभार चालविला. तरी पण त्यांचा सेव्य सेवक भाव कायमच राहिला. म्हणजे सातारचे राजे हे सत्ता रहित खरे पण नामधारी स्वामी, व त्याचे सत्ताधीश पेशवे हे सेवकच होते. ह्या प्रमाणेंच वऱ्हाड संबंधीं गोष्ट आहे. वऱ्हाडचे सत्ताधारी नाहीं तरी नामधारी स्वामी व मालक हैदराबाद सरकारच आहे. इंग्रज सरकार हे सत्ताधीश पण मालक नव्हत. आपल्यावर इंग्रजी अंमल चालणार तरी आपण निजाम सरकारचीच प्रजा आहों. व निजाम सरकार हेच आपले खरे राजे होत. म्हणजे कायमच्या कौलपट्ट्यानें मालकी जात नाहीं व वऱ्हाड प्रांत खालसा मुलुखांत गणला जात नाहीं. हा भेदाभेद चालू राज्यकारभारांत कांहींच दखल दखल करूं शकत नाहीं तरी कांहीं राज्यप्रकरणीं हा भेद अत्यंत महत्वाचा व जरूरीचा आहे, म्हणून आम्ही हा मुद्दाम कळविला आहे. 'घर मेरा व हुकूम तेरा' ही म्हण आपल्या वऱ्हाड संबंधानें अगदीं अक्षरशः लागू पडते.

वऱ्हाड प्रांत ब्रिटिश मुलुखच आहे. असें पुण्याच्या माजिस्ट्रेटांनीं लेखणीच्या एका शब्दांत ध्वनित केलें होतें. पण हा ब्रिटिश मुलुख आहे कीं नाहीं हें ठरविण्याचें काम हायकोर्टाचें आहे असें हायकोर्टास वाटत नाहीं. व वारंटाची अमलबारी करण्याची गोष्ट सर्वतः वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांच्या अखत्यारांतील आहे असा हायकोर्टाचा ठराव बाहेर आला आहे.

वऱ्हाड प्रांत ब्रिटिश आहे कीं नाहीं ही गोष्ट निर्विवाद व स्पष्ट दिसत आहे; व हें ठरविणें मुंबई हायकोर्टाचें काम नाहीं हेंहि उघड झालें. आमची पक्की समजूत आहे कीं सदहू वारंट इकडे बजावणी साठीं येईल तेव्हां आमच्या स्थानिक हायकोर्टांत या प्रश्नाचा योग्य तोच निकाल लागेल. पुण्याच्या कोर्टाचें वारंट न बजावतां परत करण्याचा अधिकार येथील कोर्टाचा आहे आणि आम्ही म्हणतों कीं बहुशः असाच निकाल होईल.

---

### प्लेग

प्लेग हा शब्द मराठी पेक्षां अधीक मराठी झाला आहे. त्याचा उच्चार होतांच मृत्यूचा अर्थबोध तत्काळ होतो. प्लेग म्हणजे रामबाण मृत्यु असाच अर्थ होऊन बसला आहे. या रोगाची चिकित्सा वैद्यक शास्त्रज्ञांनीं सोडून दिल्यासारखीच आहे. औषध चालत नाहीं असा हा रोग वाढूं लागला आहे तथापि या संबंधानें जितक्या गोष्टी लोकांच्या पुढें पुनः पुनः येतील तितक्या चांगल्या अशी आमची पक्की समजूत आहे.

प्लेगाचा उद्भव थोडासा चमत्कारिक आहे. मुंबईहून निघालेली आगगाडी जशी नाना स्टेशनें घेत घेत नागपुराला जाते तद्वत मुंबईहून निघालेला प्लेग स्थलान्तर करीत करीत आमच्या प्रांतांत आला आहे. मुंबई पासून आमच्या प्रांतापर्यंत प्लेगाची धाक पोचण्याला विलंब लागला खरा पण एक वेळ येथें तळ पडल्यावर हा प्रांत काबीज होण्याला कांहीं उशीर लागला नाहीं. प्लेगाचें स्वागत करण्याची सिद्धता पूर्वींच होऊन चुकली आहे असें दिसतें; फक्त मुंबईकडून येणाऱ्या रोगाचा परिचय स्वल्पसा पाहिजे होता. दारूगोळा भरून तोफ तयार असावी पण ती डागण्याचाच विलंब असावा तद्वत प्लेगाला लागणारी साधनभूमी या प्रांतीं तयारच होती फक्त प्रत्यक्ष मृत्युशलाका जवळ येण्याचाच उशीर होता. तो योग येताच प्लेगानें हा प्रांत फार स्वल्प काळांत आपलासा केला. हें दृष्टान्तानें सांगण्याचा हेतु इतकाच कीं प्लेगाला जशी भूमी पाहिजे तशी या प्रांतीं आहे; आणि बाहेरून प्लेगाचें बीज एक वेळ आलें म्हणजे त्याची लागवड या भागीं लागलीच होते. तथापि ही भूमी प्लेगाच्या लागवडीला योग्य कशी व प्लेग बाहेरून

येतो ह्मणून काय होतें याचा निकाल तसाच समजल्या शिवाय राहतो.

आमच्या मतें जीं लोकवस्तीचीं शहरें व गावें आहेत तीं सर्व प्लेगाचींच काय पण सर्व प्रकारच्या सांथीच्या रोगांचीं वसति स्थानें आहेत. जेथें वस्ती अगदीं दाटून आहे, जमिनींत पाणी मुरून सडतें, सांड पाण्याचा चांगलासा निकाल नाहीं, पायखाने व मुतान्या ही जेथें वर्षाचीं वर्षे चालू आहेत, जेथें गटारांतून स्वच्छता न राहिल्यामुळें तीं घाण व दुर्गंधी यांचा चोहोंकडे फैलाव करितात, सूर्य किरणांचा प्रवेश जेथें फारसा होत नाहीं, हवा चांगलीशी खेळत नाहीं तेथें कोणत्याही रोगाला स्थळच मिळतें. सारांश, स्वच्छता नाहीं, हवा शुद्ध नाहीं, सूर्यतेज नीटसें खेळत नाहीं तेथें सर्वच रोगाला आश्रय मिळतो.

प्लेग उद्भवण्यापूर्वी तो एका स्थलाहून दुसऱ्या स्थळीं येतो. एका स्थळाचा स्पर्श दुसऱ्या स्थळाला बाधतो. हा रोग स्थल विशिष्ट जितका असतो तितका व्यक्तिविशिष्ट नसतो. संस्पर्शाची बाधा व्यक्तीपासून व्यक्तीला होत नाहीं पण तो संस्पर्श एका स्थळाचा दुसऱ्या स्थळाला जलदी बाधक होतो. प्लेगाचा कृमी असतो असें मानलें तर एका विवक्षित दूषित स्थळीं राहणारा मनुष्य या कृमीनें रोगग्रस्त होतो. प्लेगाची हवाच आहे असें ह्मटलें तर त्या हवेंत राहणाऱ्या माणसाच्या शरीरांत प्लेगाचा कृमी उत्पन्न होऊन नंतर हा रोग जडतो; असें मानावें लागेल. कांहींही समजूत घेतली तरी प्लेगाचें सूक्ष्म कारण कांहींच कळत नाहीं. प्लेगाचें खरें निदान समजत नाहीं तोंपर्यंत अज्ञानाच्या अंधारांतच ठेंचकळलें पाहिजे. या शिवाय कोणत्या शरीरप्रकृती या रोगाला सत्पात्र आहेत याचीही कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. अशा स्थितींत साधारण गोष्टी आपण धोरणा धोरणानें पाहिल्या पाहिजेत. व त्या दुहेरी आहेत.

पहिला उपाय प्लेगाला प्रतिबंधक पाहिजे या कोटींतला उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे प्लेगानें दूषित झालेल्या भागाचा त्याग. स्थलान्तर करण्याचा उपाय शास्त्रीय दृष्टीनें फार चांगला आहे. प्लेगाला अनुकूल असलेल्या भूमीचा त्याग करून या ठिकाणच्या घाणी व दुर्गंधी नसतील अशा स्थळीं राहण्यास गेलें पाहिजे असें स्थळ ह्मणजे वानप्रस्थाला योग्य अशा स्थळाची योजना पाहिजे. अशा स्थळीं शरीराला आरोग्यकारक अशा गोष्टींची उपलब्धि आपोआप होते. रानांत राहण्यानें मोकळ्या हवेंत व्यवसाय होतात. तेथील शीत व उष्ण यांच्या विरोधी उपचारांनीं शरीराला सुखच होतें. अन्नाचा अंश पोटांत अधीक जातो. मनुष्य जें खातो तें त्याला चांगलें पचतें. वनभोजनाची गोडी विशेष आहे. ती गोडी अनुभवानेंच कळण्या सारखी आहे स्थलान्तराचा उपाय सोपा नाहीं. गरिबांच्या अडचणी नानाविध असतात; त्या दूर होतील तितक्या कराव्या व खुल्या शेतात वास्तव्य करावें. प्लेगानें वनभोजनाची व तपोवनाची चांगली ओळख करून दिली. पूर्वीच्या या दोन्ही गोष्टींचा महिमा प्लेगानें चांगला समजावून दिला. ज्याला जशी अनुकूलता असेल त्यानें त्या मानानें स्थलान्तराच्या उपायाचा अंगिकार अवश्योच करावा.

त्या खेरीज गृहशुद्धीचे उपाय नेहमी चालू ठेवावेत. सर्व उपायांची स्वच्छता ही मुख्य गुरुकिल्ली होय. ती सुसाध्य होईल असा नियम ठेविला पाहिजे. हवा शुद्ध करणारे धूपदीप, होमहवन इत्यादि गोष्टी वर्णाश्रमधर्मा प्रमाणें जरूर कराव्या. लिंबाचा पाला जाळून गंधक, ऊद डामर इत्यादि द्रव्याचा धुपारा गृहाला देत जावा. सूर्याचा प्रकाश घरात सर्वत्र येईल अशी योजना अगोदर करावी.

अनुभवानें ही गोष्ट सिद्ध आहे कीं उष्णतेचा संबंध प्लेगाच्या रोगाशीं विशेष आहे. उष्णतेमध्यें प्लेगाच्या कृमीचें परिपोषण होत नाहीं. उष्ण प्रदेशांत प्लेगाचा रोग आपोआप हटत जातो. तशांत उष्ण कालामध्यें ही मांदगी फारच कमी होत असते. साधारण अनुमान असें आहे कीं प्लेग पावसाळ्याच्या अखेरीला लवकर होतो व हिंवाळ्यांत त्याला जोरच जोरच असतो. उन्हाळयांत हा रोग आपोआपच कमी होतो. प्लेग एक वेळ आला कीं, वर्षाचीं वर्षे तो स्थीर राहतो. हा सांथीचा रोग असल्यामुळें पुष्कळ्या संहार झाल्या शिवाय तो थांबत नाहीं.

---

## लष्करी फेरफार

'हैदराबाद कांटिनंट' ह्मणून जी फौज आहे तिची व्यवस्था निराळ्या तऱ्हेनें इंडिया सरकारानें केली आहे. ही फौज या पुढें स्वतंत्र व पृथक् अशी राहणार नाहीं. वऱ्हाड प्रांत कौलपट्ट्यानें घेतल्यामुळें निराळी फौज ठेवण्याची गरज राहिली नाहीं. जालना, हिंगोली, मोमिनाबाद व रायपूर येथील छावणी उठविण्याचा हुकूम झाला आहे आणि या छावणीचा मुलूख निजाम सरकाराकडे परत देण्यांत येईल. इलिचपूरची छावणी देखील उठविण्यांत येणार आहे पण तेथील लष्कराची सोय अन्यत्र होई पर्यंत तूर्त ती हल्लीं प्रमाणेंच चालूं राहील. बोलारम व औरंगाबाद येथील छावणी कायम ठेवून तेथें प्रत्येकीं १ घोडेस्वार पलटण व दोन पायदळ पलटणी या प्रमाणें फौज राहील. येत्या आगष्ट महिन्या पासून अलिशान नामदार रेसिडेंट यांच्या मिलिटरी सेक्रेटरीची जागा बंद करण्यात येणार आहे. त्या प्रमाणेंच जनरल आफिसर कमांडिंग, असिस्टंट आडजुटंट जनरल व स्टेशन स्टाफ आफिसर इत्यादी हुद्देदार अर्थातच कमी करण्यांत येतील. 'हैदराबाद कांटिनंट' फौजेची रचना या प्रमाणें मोडण्यात आली आणि लवकरच वऱ्हाडच्या राज्यकारभाराचाहि ठराव प्रसिद्ध होईल असा अंदाजा आहे. वऱ्हाडच्या प्रश्नाचा निकाल झाल्या मुळें हे लष्करी फेरफार अंमलात येत आहेत. जों पर्यंत लष्करी खर्च निजाम सरकाराकडून परभारें मिळावयाचा होता तों पर्यंत या 'हैदराबाद कांटिनंट' लष्करी आमल्याचा खर्च सालिना ४० लक्ष रुपयांचा होता. ब्रिटेश खजिन्याशीं संबंध पडतांच लागलीच पुष्कळसे फेरफार करण्यांत आले व कांहीं छावण्या देखील उठविण्यांत आल्या. हा आपपरभाव कांहीं आश्चर्य करण्यासारखा नाहीं. हा सर्वत्र सारखाच पदोपदीं आढळतो. इंग्लंडापुढें इंडिया देश परकी वाटतो आणि तो तसाच वाटला पाहिजे परंतु आह्माला दुःख इतकेंच वाटतें कीं इंडिया देशाविषयीं हा परकीय भाव दूर होण्याला प्रारंभ देखील अजून झालेला दिसत नाहीं.

---

लष्करी खात्या संबंधानें इंडियनांची मोठीच अवहेलना होत आहे इंडियनाला लष्करी खात्यात मोठी हुद्देदारी मिळण्याचा संभवच नाहीं. सर्व हुकूम ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातीं आहे. हुकमतीच्या जागा सर्वत्र गोऱ्या अधिकाऱ्यांस दिलेल्या असतात. लष्करी खात्यात इंडियनाचा शिरकाव होण्याचा संभव फार थोडा ! गेल्या महिन्यांत बजेटावर वादविवाद झाला तेव्हां नामदार आगाखान व नामदार गोखले यांनीं याच गोष्टीला उद्देशून कांहीं सूचना केल्या व लष्करी खर्च कमी करण्याच्या जागा दाखविल्या. दोन्ही कौंसिलदारांचा विचार एकच पडला. त्यांचें ह्मणणें असें पडतें कीं गोरी फौज जितकी रास्त वाटेल तितकी ठेवा पण नेटिव फौजे विषयीं निदान पुष्कळ सुधारणा करण्या सारख्या आहेत. लष्कर ठेवण्याच्या रिती दोन प्रकारच्या आहेत. लढाई असो किंवा शांतता असो, लष्कर ह्मणून कायमच्या नियमित पलटणी ठेवावयाच्या असतात. ही पहिली रीत होय. दुसरी रीत अशी कीं लढाईच्या वेळीं जें लष्कर लागतें तें शांततेच्या वेळीं लागत नाहीं; तेव्हां अशी युक्ति काढली आहे कीं शांततेच्या वेळीं लागणाऱ्या लष्कराची इयत्ता नियमित करावयाची आणि लष्करांत चाकरी केलेल्या लोकांस १०।१२ वर्षांच्याच चाकरी नंतर पेनशनांत काढावयाचें आणि त्यांच्या जागीं नवीन लोकांची भरती करावयाची. असा उपक्रम चालू ठेविला ह्मणजे शांततेच्यावेळीं लागणारें लष्कर कायम राहतेंच आणि पेनशनींत काढलेल्या लोकाचा वर्ग मोठा झाला ह्मणजे या लोकांस लढाईच्या प्रसंगीं कामावर बोलवता येतें. या रितीनें प्रत्यक्ष जितकें लष्कर उभें असतें त्यापेक्षां कितीतरी मोठें लष्कर या पेनशनदार मंडळींतून तयार होण्या सारखें असतें. थोड्या वर्षांच्या चाकरी नंतर पेनशन देण्याचा मुद्दा असा कीं, पेनशनदार हे हुकूम होईल तेव्हा लष्करी कार्याला उपयोगी असे लोक असतात, थोड्या पेनशनीवर या लोकांचें लष्कर तयार करितां येतें आणि अशा रितीनें इतर लष्कराच्या बरोबरीनें वाटेल तितकें लष्कर प्रसंगोपात तयार ठेवितां येतें. ही लष्करी व्यवस्था युरोपातील सर्व राष्ट्रांमध्यें अंमलांत आहे पण तिचा अंमल या देशांत करूं नये असा स्टेट सेक्रेटरीचा हेतु दिसतो. गोऱ्या लष्करा संबंधानें ही व्यवस्था इंडियात आहे पण त्याची फलश्रुती ग्रेटब्रिटनला असून खर्चाचा बोजा मात्र पुष्कळ वाढता आहे. जे गोरे लष्करी लोक थोड्या मुदतीच्या चाकरी नंतर पेनशन घेतात ते विलायतेंत जाऊन राहतात. त्या मुळें ब्रिटिश फौजेला त्यांचा मोठा धिरावा व आश्रय मिळतो आणि वस्तुतः पेनशनीचा खर्च व त्यांच्या जागीं नविन भरती करण्याचा खर्च इंडियावर पडतो. नेटीव फौजे संबंधानें सरकार ही व्यवस्था अंमलांत आणूं इच्छित नाहीं. नेटीव लोक लष्करी चाकरींत निष्णात असलेले व पेनशनींत निघालेले असे पुष्कळसे देशभर पसरले तर त्या पासून ब्रिटिश राज्याला धोका आहे असें आमच्या राज्यकर्त्यांस अजून वाटते हें आमच्या निस्सीम राजभक्तीला उत्तम बक्षीसच ह्मटलें पाहिजे. नेटीव लष्कर जेवढें उभें आहे तेवढेंच या देशात उपलब्ध लष्कर होय. त्याच्या पाठीमागें लष्करी चाकरी करण्यासारखें पेनशनदार लष्करच नाहीं. वस्तुतः असें लष्कर फार जरूरीचें आहे. अशा लष्करानें देशाला खर्च कमी पडतो आणि शांततेच्याच वेळीं लागणारें लष्कर कायम ठेविलें असलें तरी लढाईच्या वेळीं हुकूम देतांच सज्ज होणारें असें मोठें लष्कर पेनशनीच्या खर्चामध्यें ठेवण्याची सोय आपोआप होते. सुधारलेल्या सर्व पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांत ही व्यवस्था फार सर्वोत्कृष्ठ ठरली आहे पण इंडियांत या पद्धतीचा अंमल होत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय. या देशांत अगोदर लष्करी कला लोपल्या आहेत, लोकाच्या अंगीं वीरश्री ह्मणून राहिली नाहीं, त्यांस शस्त्रें धरण्याचें ज्ञान देखील नसतें, आणि हत्याराच्या कायद्यानें त्यांस निःशस्त्र व पंगु करून सोडलें आहे. अशा वेळीं वर निर्दिष्ट केलेली लष्करी सुधारणा होईल तर नेटिवांस त्यांच्या छत्रपती बादशहा एडवर्ड यांचा मोठाच अनुग्रह झाल्य सारखें वाटेल आणि आपल्या राजभक्तीला योग्यसा मोबदला मिळाला असें वाटेल. प्रीतीनें व विश्वासानें प्रीती व विश्वास वाढतो आणि ग्रेट ब्रिटन व इंडिया यांचा एकजीव प्रभुसत्तेनें होण्या सारखा आहे तेव्हां नेटिवास शस्त्रधारी, रणशूर व लढवय्ये केल्या पासून आमच्या राज्यकर्त्यांचें अकल्याण नाहीं हें आह्मी प्रांजलपणानें कळवितों.

---

## श्रीमंती

आमच्या देशाची श्रीमंती मोठी आहे आणि उत्तरोत्तर तिची अभिवृद्धि होत आहे असा सरकारी अभिप्राय पडतो. असा प्रकार वास्तविक असेल तर तो आह्मांला मोठा आनंदकारक वाटेल. परंतु वस्तुस्थिती विपरीत आहे आणि त्या मुळें चिंता करण्याची उपाधि बळवत्तर वाढली आहे. सरकारी फडणीस सांगतात कीं, लोकांची स्थिती एकंदरीनें अधीक चांगली दिसते! याची मुख्य [illegible] अशी कीं रयत जे नाना कर देते त्यांची वाढ ह्मणजे देशाचे संपत्तीची वाढ होय. कांहीं कर असे आहेत कीं त्यांच्या वाढी वरून लोकांस अधीक पैसा खर्च करण्याची ताकद आल्या विषयीं दिसून येते. मिठाचा कर, जकातीचें उत्पन्न, अबकारीचें उत्पन्न, पोस्ट आफिसाचें उत्पन्न, व जवळ जवळ स्टांपाचे उत्पन्न इत्यादि उत्पन्नाच्या

बाबी वाढल्या ह्मणजे लोक मीठ अधीक खाऊं लागले, बाह्य राष्ट्राचा माल पुष्कळसा अधीक वापरूं लागले. मद्यादि पदार्थांचें सेवन करण्याकडे जास्ती पैसा खर्च करूं लागले, दळणवळणाच्या गोष्टी अधिकाधीक वाढल्या मुळें पोस्ट आफिसाचें उत्पन्न बरेंच वाढलें व तसेंच लोकांचे व्यवहार व उद्योग वाढल्यामुळें दस्तऐवजी व कोर्ट फीच्या स्टांपाचें उत्पन्नही चांगलें वाढलें या व अशाच गोष्टी कबूल कराव्या लागतील आणि या पासून लोकांच्या श्रीमतीचाच बोध होतो असा निर्णय काढला पाहिजे. सरकारी दृष्टीनें ही गोष्ट अगदीं निरुत्तर की आहे आणि या देशाच्या संपत्ती विषयीं शंकाच घेण्याला स्थळ नाहीं. मिठाच्या उत्पन्ना संबंधानें नामदार गोखले यांनीं आंकडे ओढून दाखविलें आहे कीं गेल्या १८९९-१९०० च्या दुष्काळा नंतर मिठाचें उत्पन्न वाढत आहे हें खरें पण या वाढीचें कारण दुष्काळा नंतर थोडीशी सुधरत चाललेली लोकस्थिती होय. परंतु मिठाच्या कराचा आंकडा १८९८-९९ सालाचा घेतला तर असें आढळेल कीं १८९८-९९ सालीं मिठाचें उत्पन्न ९ कोट ९ लक्ष रुपये होतें पण तें १९०२-०३ सालीं ९ कोट ६ लक्षच होतें. या वरून हें ध्यानांत येईल कीं दुष्काळापेक्षां लोकस्थिती बरी ह्मणजे दुष्काळाच्या पूर्व कालापेक्षा हा देश सुधरला आहे असें दिसत नाहीं. सरकारी फडणिसांचे आंकडे थोडसे चुकीचें आहेत व त्यांनीं केलेली तुलनाही गैरसमज करणारी आहे. पोस्ट आफिसाच्या उत्पन्नाची गोष्ट जवळ जवळ अशीच आहे. दिल्ली दरबारामुळें पोस्टाचें उत्पन्न वाढलें; हा केवळ आकस्मिक फायदा होय. अबकारीचें उत्पन्न वाढलें आहे याचा अर्थ नामदार गोखले असा घेतात कीं लोक व्यसनी अधीक झाले आहेत. जकातीचें उत्पन्न वाढलें याचा अर्थ इतकाच कीं लोक विलायती माल अधीक वापरूं लागले ह्मणजे त्या मानानें देशी कपडालत्ता वगैरे सर्व कमी खपूं लागलें; देशी उद्योग बुडाला लोक शेतीवर अधीक चरितार्थ करूं लागले; आणि या गर्दीमुळें शेतीचीही नासाडी झाली आहे. जकातीच्या उत्पन्नाची वाढ ह्मणजे देशाच्या ऱ्हासाचीं लक्षणें आहेत.

अमदाबाद येथील प्रदर्शनाच्या वेळीं श्रीमंत गायकवाड सरकारानीं ह्मटल्या प्रमाणें आमच्या देशाला उन्नित काल येण्याचा मुहूर्त हाच आहे आणि हा अखेरचाच मुहूर्त आहे. हा चुकला कीं आपला देश नामशेष झाला असें समजावें. बऱ्हाणपूर येथें गेल्या ८ वे तारखेला बंगाल्यची प्रांतिक परिषद भरली होती तेव्हा महाराज जगदींद्रनाथ बोलले कीं परकी अंमल, परकी भांडवल व परकीयांच्या हातीं असलेली यांत्रिक शक्ती यांनीं हा देश अगदीं बुडल्यासारखा झाला आहे. या देशाच्या सांपत्तिक ऱ्हासाला हींच कारणें घडलीं आहेत आणि देशी उद्योग वाढणार नाहींत, देशी कलाकौशल्याचें पुनरुज्जीवन होणार नाहीं तर हिमालया पासून कन्या कुमारी पर्यंत सर्व देशभर व्यापारधंदे वाढले आणि सर्वत्र विलायती भांडवलानें नफ्याचीं द्वारें बंद करून टाकली तर आमच्या नशिबीं दारयत्व किंबहुना जुरदारी आमरण लिहिली आहे असें पक्कें समजावें. वर जीं लक्षणें देशाच्या संपत्तीचीं ह्मणून सरकारानें निर्दिष्ट केलीं आहेत तींच आमच्या गरिबीचीं व ऱ्हासाचीं खरीं दर्शकें आहेत. इंडियाचा भावी भाग्यकाल देशी कलाकौशल्यावर व उद्योगवृद्धीवर अवलंबून आहे असाच सिद्धान्त खरा ठरतो.

---

## योग्य नेमणूक

मद्रास हायकोर्टांच्या न्यायाधीशाच्या जागीं नामदार सी. शंकर नायर यांची नेमणूक कांहीं महिन्या करितां करण्यांत आली आहे. हे गृहस्थ उमरावतीच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होते आणि त्यामुळें या थोर गृहस्थाची ओळख आमच्या प्रांतांतील लोकास चांगली असेल. लोकनायक सरकारच्या मोठ्या हुद्देदारीला अशा प्रकारें सत्पात्र ठरतात अशा वेळीं सरकारचें अभिनंदन केल्या शिवाय आमच्यानें राहवत नाहीं. असे योग फार विरळा येतात. पण ही गोष्ट राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षा संबंधानें तिसऱ्यानें घडत आहे हें पाहून मोठा आनंद वाटतो. मे. बद्रुद्दीन तयबजी मद्रासच्या सभेचे अध्यक्ष होते ते मुंबईच्या हायकोर्टांत विराजमान आहेत. नामदार चंदावरकर हेही राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होते आणि ते सध्यां मुंबईच्या हायकोर्टांत न्यायाधीश आहेत. त्या शिवाय राष्ट्रीय सभेचा मुख्य कार्यभार ज्यांच्याकडे होता अशा राष्ट्रीय संतमालेपैकीं दुसरे तिघे गृहस्थ सरकारच्या सन्मानाला पूर्वींच पात्र झाले आहेत. कै० नामदार तेलंग यांचें स्मरण अशा प्रसंगीं अगोदर होतें. नामदार गुरुदास बानर्जी व तसेंच नामदार सुब्रह्मण्य अय्यर हे उभयतां कलकत्ता व मद्रास येथील हायकोर्टांत न्यायाधीश होण्यापूर्वी राष्ट्रीय सभेचे मुख्य चालक होते. राष्ट्रीय सभेचा हा बहुमान आहे; किंबहुना सरकारी न्यायासनाला अशा नररत्नांनीं चांगली शोभा येते असें ह्मटलें तरी चालेल.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL

13 1903

The problem of agriculture is to attract capital for large investments therein. There is a wide and increasing deterioration in this profession. We do not see improvements in the old-fashioned ways of cultivation. Crops after crops are being realized from year to year but those who do the work in the field are almost from the class of landless labourers. They have little interest in the improvement of the soil. They look to their wages only or if they get a field on a lease their sole interest centers in the out-turn of the crop. Their efforts are directed to secure a large margin of profit. We have seen as a rule that the speculations of the lessees of fields are most deceptive and there is an annual increase in the indebtedness of these people. Many invest capital in land with a view to secure therefor a moderate rate of interest. Further than that the monied people do not care for the improvement of the soil. In our province, there are practically two classes of people. The first is that of the rich capitalists. They see that their investments are safe in the purchase of the landed property. The second class is of the large masses who are gradually increasing in large numbers. They have almost lost their old holdings and are now labourers in some form or another on the land of their ancestors. The new class is of the middlemen who utilize the labour of the second class of people. The result is that the agriculture of the province shows signs of unmistakable deterioration. We are afraid that the unduly enhanced prices of land are due to the greed of investing money in the immoveable estates. There is a better and more secured investment in land. There is a rush of capital in this direction. But there is no community of interest between the owners of fields and the labourers thereon: that is the system of letting out land at a fixed sum of money which is twice, thrice or even four times the government assessment. We condemn this system of leasing out land. It opens wide a door for speculation and the people who lose therein are those who find no field open for them and have to resort to agriculture which is the only profession left for them. This is the cause of ruin of a number of families of agriculturists. Their speculations prove untrue. There are so many things most uncertain upon which the harvest depends. In many cases there are failures partial or total of crops and the lessees are those who have to sell their other property in order to secure land for future cultivation. We have further observed that the new assessments have also done an immense harm to the progress of agriculture. The margin of profit is further curtailed and the people are impoverished to a larger extent on that account. We hope that the Local Government will see their way to reduce the land—tax to a moderate amount and to prohibit as a rule the present system of leasing land at a fixed amount of money irrespective of the out-turn of crops. It should be a rule that each occupant of a holding as well as his co-sharers, is any, should either cultivate land at home or should let it on *Batai.* This latter form introduces a sort of hamony and community of mutual interest in the owner and the cultivator of a holding. Confidence begets confidence and we hope that this new change will help to improve agriculture to a perceptible scale. We want our agriculture to show signs of vitality, and an onward motion for general progress.

---

Industrial servitude seems to be the fate of our people if we do not come forward to protect our country from the downfall in our industrial and commercial life. India is gaining a new foot—hold as the central sun of the Asiatic dominions for which the European nations are competing heart and soul. This new position makes India an important country where further exploitation will be at its highest point for further advantages to the British nation. But all this greatness of India will not be of any help to raise us to a higher level of prosperity. Our poverty will be our fatal curse. In this connection Maharaja Jagadindranath as President of the Bengal Provincial Conference thus observes:—

"Notwithstanding recent pronouncements to the contrary, we can hardly change our opinion that the importation of foreign capital is not an unmixed blessing. The word "exploitation" is in bad odour just now; so I shall not use it. But if the resources of India are to be developed by outside capital, what part do we Indians take in it?—That of coolies? India may be made a great commercial base—the whole country from the Himalayas to Cape Comorin may be turned inside out, but how will that benefit us except as wage-earners. We may as well be expected to jubilate over the development of South Africa by means of indentured Indian coolies. Europe has cooly set apart for us the portion of hewers of wood and drawers of water in the economy of the world but even Europeans, I presume, can see that this can hardly serve us for a national ideal."

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान—उष्णता चांगली वाढूं लागली होती, परंतु हवेंत पुनः थंडपणा आला आहे. सध्याची थंडी आरोग्यकारक वाटते. रोगराईचें मान कमी आहे.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर तहशिलदार यांनीं दारव्हा तहशीलीचाच चार्ज घेतला. व रा. रा. रामराव बापुजी पतकी हे केळापूर तहशिलीवर रुजू झाले.

चंद्रग्रहण— रविवारीं पहाटेस चंद्रग्रहण चांगलें स्पष्ट दिसलें. चंद्रबिंबाचा पूर्ण खग्रास झाला होता. कांहीं जण ह्मणतात कीं बारीकशी चंद्रकोर दिसत होती. शनिवारीं सूर्यास्ताला चंद्र आठ दहा अंश क्षितिजावर आला होता आणि त्यामुळें अरुणोदयाचा प्रकाश पडण्या पूर्वींच चंद्राचा अस्त झाला व मोक्षकालाचें पूर्ण चंद्र बिंब रविवारी सकाळीं दृष्टीस पडलें नाहीं.

युति— चंद्र व मंगळ यांची युति शुक्रवारीं रात्रीं दृष्टीस पडली. सिंह राशीला हे दोन्ही ग्रह असून चंद्राच्या पूर्ण तेजामुळें मंगळाची रक्तिमा अस्पष्ट दिसते.

मे. निजामुद्दीन हसनखान डिपुटी कमिशनर यवतमाळ यांस असिस्टंट सेशनजज्ज प्रमाणें देहांत शिक्षे शिवाय सर्व अधिकार देण्यांत आला.

आकोल्यास नदीच्या पश्चिम भागाला मोठासा प्लेगाचा आजार नाहीं, परंतु त्या भागांतील गटारें स्वच्छ न केल्यामुळें फार प्लेग वाढण्याची मोठी भिती आहे. म्युनसिपालीटी कांहीं रस्त्यावर पाणी टाकते पण या भागांत गटारें धुण्याला पाणी देत नाहीं. कोण हा आंधळा कारभार!

---

## वर्तमानसार

**सक्त हुकूम**—तुर्कस्थानचे सुलतान साहेबांनीं एक जाहीरनामा काढून सर्व मुसलमान कामदारांस मग ते लष्करी नोकर असोत, किंवा इतर खात्यांतील कामदार असोत, पिण्याच्या दारूस शिवल्यास त्यांस एकदम कैद केलें जाईल असें फर्माविलें आहे. अशी व्यवस्था इकडे केव्हां होईल तोच सुदीन म्हणावयाचा.

संकेश्वरचे जगद्गुरु याना इनाम असलेला गांव नवीन श्रीशंकराचार्यांची स्थापना आपले परवानगीनें झालेली नाहीं म्हणून नामंजूर करून कोल्हापूर सरकारनें जप्त करून टाकिल्याचें तेथल्या एका पत्रावरून समजलें आहे.

**दगडांतून दुर्गंधी**— मिसर देशांतील पिरामिदाचे जे चिरे आहेत त्यांची अशी गंमत आहे कीं, त्यांच्यावर आघात केला तर त्यांतून दुर्गंधी येते. हा काय चमत्कार असावा कोण जाणे.

**दिवाण साहेबांवर खटला**—हैदराबाद येथे सुप्रसिद्ध सर किसनप्रसाद यांनीं तेथील एका नबाब साहेबाच्या नातेशीं त्यांच्या मर्जीविरुद्ध तिला पळवून नेऊन अशास्त्र लग्न लाविलें म्हणून त्यावर खटला सुरू आहे.

**भयंकर आग**— कलकत्ता जवळील बजबज येथील राकेल तेलाच्या वखारीस भयंकर आग लागून १५ लक्षांचें नुकसान झालें. ह्या आगीचा उजेड दूरवर दिसत होता. ही आग ५।६ दिवस जळत होती. जवळच्या दुसऱ्या वखारीवर चार दिवस एक सारखा पाण्याचा वर्षाव सुरू ठेवला होता.

**विजेची बंदूक**— एका नार्वेजियन मनुष्यानें विजेची बंदुक तयार केली आहे. ही फार चांगली असून धूर वगैरे न होतां उत्तम काम करिते.

**लांडग्याची गोष्ट**—एका गांवीं लग्न आटोपून दोन वाजंत्री व तासेवाले येत असतां वाटेंत पाऊस लागूं लागल्यामुळें निवाऱ्याच्या पडित जागीं बसले. रात्रीं ५-६ लांडगे तेथें त्यांच्यावर चाल करून आले. तो मंडळी घाबरून त्यांनीं आपलीं वाद्यें वाजविण्याची सुरवात केली. त्या आवाजा सरशी ते लांडगे भ्याले व पळून जाण्याच्या गर्दींत त्यांनीं एकमेकांस ठार केलें व बाकीचे पळाले. यावरून वाद्यांच्या अवाजानें लांडगे पळून जातात, असें दिसतें. इतर वन्य पशूकरितांहि हे सोपे उपाय उपयोगीं पडण्यासारखे आहेत.

**चालण्याची शर्यत**— ड्रेस्डन व बर्लिन यांच्या दरम्यान नुकतीच एक चालण्याची शर्यत झाली. ही शर्यत कार्लमन नांवाच्या मनुष्यानें जिंकली. तो ३१ मैल व २०० यार्ड रस्ता ४ तास व ५८ मिनिटांत चालला व फिरून ६२ मैल व ४०० यार्ड रस्ता ११ तास १९ मिनिटांत चालला. सध्यां तो ९८ वर्षांचा आहे. तो २० वर्षांचा असतांना मांसाहार खाणारा असून अगदीं अशक्त होता. पुढें मांसान्न खाण्याचें सोडून देऊन पाणी, द्राक्षाचा रस, व नानाप्रकारचीं कच्चीं फळें खाऊन तो राहूं लागला. तो कोणत्याही प्रकारचें शिजविलेलें अन्न खात नाहीं हल्लीं तो चांगला सशक्त व चपळ झाला आहे.

**नवीन राज्यप्राप्ती**—इंग्लंदचा राज्यविस्तार पराकाष्ठेचा वाढला आहे. तथापि त्याच्या सद्दीचा जोर असा कांहीं विलक्षण दिसतो कीं, तेथील मुत्सद्दी नको नको म्हणत असतां भराभरा राज्येंची राज्यें इंग्लंदास फार श्रम न करितां मिळत आहेत. मध्य आफ्रिकेंतील सोडनच्या पश्चिमेस व सहाराच्या दक्षिणेस सुमारें २ लक्ष चौरस मैल प्रांत म्हणजे सुमारें स्पेन देशा येवढा विस्तृत प्रांत थोड्याशा युरोपियन अमलदारांनीं तिकडील नेटिव लोकांच्या पलटणीच्या सहायानें काबीज केला आहे. येथें राहणारे बहुतेक लोक नीग्रो, हौसा, फुला या जातींचे आहेत. सुमारे शंभर वर्षांपूर्वी आथम न डान फोडियो नांवाच्या एका नीग्रो योद्ध्यानें हें राज्य स्थापन केलें होतें. यांत तांदूळ, गहूं कापूस, नीळ हीं पिकें उत्तम येतात. या देशांत लोखंड विपुल सांपडतें. येथील राज्य खालसा होण्यासही ब्रह्मदेशाप्रमाणें एका व्यापारी कंपनीचें कारस्थान कारणीभूत झालें. या प्रांताजवळ चाड नांवाच्या सरोवराभोंवतीं फ्रेंच लोकांनीं राज्य चालविलें आहे. हल्लीं इंग्रजांनींही त्यांच्या कारस्थानास तोंडास तोंड दिलें आहे.

**फार मजेची लॉटरी**—अमेरिकेंत एका मनुष्यानें आपली बायको मेल्यावर आपल्या नांवावर लॉटरी काढली आहे. प्रत्येक तिकिटास १२ आणे प्रमाणें विक्री करूं लागला आहे. मजशीं लग्न करण्याची इच्छा असेल त्यांनीं १२ आणे देऊन तिकिटें घ्यावीत व शेवटीं जिचे नांवची चिठी येईल तिजशीं लग्न करून घेईन. अशा ७०० स्त्रिया जमल्या आहेत. अशी लाटरी स्त्रियांनीं काढली तर फारच फार फायदेशीर होईल.

**समुद्र सर्प**- चिनी समुद्रामध्यें एका फ्रेंच टार्पेडो बोटीवरील अधिकाऱ्यास एक पोहत असलेला मोठा समुद्रसर्प दिसला. त्यानें बोट सोडून पाठलाग केला. परंतु त्याचा वेग फार असल्यामुळें त्यास गांठतां येईना. म्हणून बोटीवरून त्याजवर एक तोफेचा गोळा सोडला.

**चिखलाची वृष्टी**- सिलइडचे दक्षिण भागांत चिखलाची वृष्टि होऊन त्यापैकीं पुढें झाडाचे पानांवर व जमिनीवर बारीक धुरकट रंगाची धूळ राहिली. गेल्या वर्षीही त्या भागांत असाच चमत्कार झाला होता.

**मोरॉक्कोंतील बंडावा**- थांबला नाहीं, सुलतानाच्या युरोपियन राहणीमुळें लोकांची क्षुब्धता शांत होत नाहीं सुलतान युरोपांतून शस्त्रें, दारूगोळा व इतर माल मागवीत आहे. नुकताच त्यानें कांहीं जमीन जुमला इंग्लंडांत विकत घेतला असून लंडनच्या एका बँकेंत त्यानें आपलें जडजवाहीर ठेविलें आहे. हेतु हा कीं बंडावा फार वाढून राज्य भ्रष्ट झाल्यास इंग्लंडांत खुशाल जाऊन रहावें.

**सेनापती डी वेट**- हा ट्रान्सवालांतील आपली जमीनजुमला विकून टाकीत आहे; व आपण इंग्रजसरकाराविरुद्ध कायदेशीर बंड उभारूं असें त्यानें चेंबरलेनसाहेबांस बोलून दाखविलें होतें. म्हणून हा मनुष्य भयंकर वाटल्यावरून तिकडील अधिकाऱ्यांनीं त्याच पाठीवर डिटेक्टिव ठेविले आहेत.

**विष घेण्याला पैसा नाहीं.**— एका ११ वर्षे वयाच्या मुलीनें बंगलोर कोर्टासमोर असें बोलून दाखविलें कीं, 'माझी आई भुकेनें मरत होती म्हणून तिनें मला विष घेण्या पुरत्याच पैशाला विकलें!' हाय! हाय! किती भयंकर गोष्ट ही ! !

## कशांत काय असावें.

१ जेवणांत नेमस्तपणा आणि सावकाशपणा. २ पोषाखांत स्वच्छता आणि साधेपणा. ३ बोलण्यांत आवेश आणि प्रौढपणा. ४ व्यवहारांत उद्योगशीलता आणि निष्कलंकपणा. ५ मसलतींत कौशल्य आणि दूरदृष्टी. ६ विपत्तींत शौर्य आणि विवेक. ७ भाग्यांत नम्रता आणि औदार्य ८ जनरीत सौजन्यता आणि प्रसन्नता. ९ कृतींत सत्य आणि समजूत. १० धर्मांत ईश्वरभक्ति आणि परोपकार.

**सोन्याच्या कड्याचा डाग**— प्लेगच्या रोग्यास डाग द्यावयाचा तो गांठीवर न देतां त्याच्या सभोंवार सोन्यांच्या कड्याचा डाग द्यावा; म्हणजे ब्यूबो लवकर बसून रोगी बरा होतो, असें एकानें खांडवा म्युनिसिपालटीस मुद्दाम कळविलें आहे.

**तत्ववेत्ता बेकन**— जेव्हां राजे लोक ज्ञानी असतील किंवा ज्ञानी लोक राजे होतील तेव्हांच प्रजेला सुख प्राप्त होण्याचा संभव आहे.

**घर बांधणारा मासा**— आफ्रिकेच्या अगदीं मध्यप्रांतांत न्यासी नांवाच्या सरोवरांत एक जातीचा काळा मासा आहे तो घर बांधून रहातो. सरोवराच्या तळीं गाळीव मातीचा चिखल आहे. या चिखलांत सुमारें दोन तीन फुटांचा खळगा खणतो व त्या खळग्यांतून जो चिखल काढतो तो अशा बेतानें काढतो कीं, त्या त्याच्या खळग्या भोंवतीं या चिखलाचा एक तट बनतो. अंडीं घालण्याच्या सुमारास हीं घरें बनतात आणि अंडीं घालींपर्यंत सगळे मासे या आपापल्या घरांत राहतात. एकदां अंडीं घातलीं म्हणजे मग मात्र ते तेथून चालते होतात. अंडीं फुटून पिलें बाहेर पडलीं कीं तींही पाण्यांत भिरभिरा हिंडूं लागतात.

साधी माशी एका सेकंदात आपले पंख आठशें वेळां हलविते ! पण हें कसें शक्य आहे कोण जाणे !

अमेरिकेंत तारांतून पत्रें पाठवूं लागले आहेत !

**शीळ वाजविणारीं झाडें**—न्यूबिआ प्रांतांतील अरण्यांत एक झाड आहे तें वारा त्यानें हललें म्हणजे त्यांतून विलक्षण प्रकारचे ध्वनि निघतात. त्यांत कांहीं अलगुजासारखे, कांहीं शिंगासारखे व कांहीं नुसत्या शीळ वाजविल्यासारखे निघतात. या झाडाच्या अंगच्या या गुणामुळें तेथील रानटी लोकांस त्याचें फार भय वाटतें आणि त्यांतून असे ध्वनि निघतात तरी कसे, या बद्दल सर्वांनाच फार आश्चर्य वाटतें शेवटीं एका शास्त्रज्ञ शोधकानें त्याचा छडा लाविला. त्यास असें आढळलें कीं कांहीं ऋतूंत एका प्रकारचे असंख्य किडे त्यावर येऊन अंडीं घालतात. हीं अंडीं ते किडे नवीन फुटणाऱ्या अंकुरांवर किंवा फांद्यांच्या अग्रांवर घालतात. हीं अंडीं चिकटून रहावीं म्हणून चिकट असा कांहीं विषारी पदार्थ चिकटावितात. त्याचा सुमारें एक इंच जाडीचा थर दिसूं लागतो. पुढें योग्य वेळीं अंडीं फुटून त्यांतून किडे या थराला बारीक बारीक भोंकें पाडून बाहेर पडतात. अर्थातच त्यावरून वारा वाहूं लागला कीं, त्या भोंकांतून शिट्या वाजूं लागतात व नाना प्रकारचे सुस्वर निघूं लागतात. अशा तऱ्हेनें भिन्न भिन्न स्वर निघण्याची स्वभावसिद्ध तजवीज त्यांत आहे असें झाड हें एवढेंच दिसतें. तथापि ज्या रानांत कळकीचीं बेटें फार त्या रानांत पोकळ वेळूंतून मंजुळ असे वेणुध्वनि निघाल्याचें वर्णन कालिदासाच्या एका काव्यांत आहे.

**कागदाचें धुराडें**— कागदाचे आतां कोणचे जिन्नस होतील आणि कोणचे नाहींत, याबद्दल कांहीं मुद्दा तर्क करतां येणार नाहीं. जपानी लोकांनीं या कागदाचे किती तऱ्हेचे पदार्थ करतां येतील, हें उत्तम प्रकारें दाखविलें आहे. ज्याचे तंतू निघतील अशाच पदार्थांपासून कापड तयार होईल अशी आपली दृढ समजूत, परंतु जपानी लोकांनीं कागदाचे कापड तयार करून त्या समजुतीची व्यर्थता दाखविली. त्याच प्रमाणें ते लोक आपल्या प्रपंचास लागणारे आणखी कित्येक पदार्थ कागदाचे तयार करतात. पण ब्रेस्लो येथल्या एका शोधकानें कागदाचा रेंदा खूब दाबून त्याच्या दगडा प्रमाणें खणखणीत अशा विटा केल्या आहेत व त्या विटांवर बाळूनें बनविलेलें कांहीं लुकण घट्ट लावून त्यानें एका गिरणीला सुमारें पन्नास फूट उंचीचें धुराडें बनविलें आहे ! या धुराड्यास आगीचें भय नाहीं, असेंही म्हणतात !

**वृंदावन डोललें**—सांगलीच्या उत्तरेस ब्रह्मनाळ येथें श्रीरघुनाथ स्वामींचें वृंदावन आहे, तें गेल्या शिवरात्रीचें दिवशीं डोललें. तेथील ब्रह्मवृंदानीं ते दिवशीं हातांत गुलाल, बुक्का, घेऊन तोंडानें एक श्लोक म्हटला व तो गुलाल, बुक्का समाधीवर त्यानीं टाकतांच खरोखरच तें वृंदावन डोलूं लागलें. आणखी कांहीं वेळपर्यंत तोच श्लोक म्हणत असतां ५।६ वेळ डोलण्याचा चमत्कार झाला !

**खरी कळकळ**-इंग्लंड व अमेरिकेंतील जीं पत्रें टर्की देशाच्या हिताचे लेख लिहितील, त्या पत्रांना २०,००० पौंड वांटून देण्याचें टर्कीच्या सुलतानानें ठरविलें आहे ! आपल्या हिंदुस्थानच्या हिताकरितां लेख लिहिणाऱ्या इंग्रजी वर्तमानपत्रांना अशी देणगी सरकारनें दिली पाहिजे.

**पुण्याची टूम**- पुण्यास "संन्याशी" या नांवाचें एक वर्तमानपत्र आणि "नायकीण" या नांवाचें एक मासिक पुस्तक निघणार आहे, ही आपली पुण्याची टूम आहे.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका ........................ ०२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......... ०१ ०६
दुसरे खेपेस.... .........०१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 20 APRIL 1903 NO 15

वर्ष ३७ आकोला सोनवार तारीख २० माहे एप्रिल सन १९०३ इ० अंक १५

### केंस व कलफ

केंसाचे अंगीं रंग घेण्याचा जो धर्म आहे तो त्याच्या अंगच्या सछिद्रपणामुळें होय. केंसाची रचना इतकी छिद्रमय नसावी असें आपणांस त्याच्या रचनेवरूनपुढ्यां वाटण्याचा संभव आहे. तसेंच, त्याच्या घटकावयवांमध्यें गंधक असतो, यामुळें शिसें व पारा इत्यादि खनिज पदार्थ त्यास लाविले असतां काळा रंग येतो. कारण, ह्या दोहींचें गंधकाशीं जें रसायनिक मिश्रण होतें त्याचा रंग काळा असतो. शिसें किंवा पारा ह्याचें सौम्य मिश्रण फायानें अथवा ब्रशानें केंसास लाविलें असतां ह्याचा बराच भाग केसांत शिरून त्यांतील गंधकाशीं संयोग पावून सल्फ्युरेट आफ् मरक्युरी बनतो व ह्यामुळेंच केंसास काळा रंग येतो. केसांत ज्या प्रमाणें गंधक असेल त्या प्रमाणानें रंग गडद होतो. काळ्या केंसापेक्षां तांबूस अथवा भुरक्या रंगाच्या केसांत गंधक अधिक असतो, त्यामुळें अशा प्रकारच्या केंसास उत्तम काळा रंग चढतो. केंसांतील गंधकाच्या उणिवेमुळें जर काळा रंग त्यास येत नसेल तर ती उणीव भरून काढण्यासाठीं कलफांत गंधकाचें मिश्रण करणें जरूर आहे. अशा स्थितींत नुसत्या हायपो सल्फाइड आफ् सोड्याचें मिश्रण लाविल्यानें केंसास उत्तम काळा रंग येतो. किंवा शिशयाबरोबर गंधक मिश्र करून कलफ तयार करणें चांगलें. प्रसिद्ध आयर्स हेअर व्हीगर ह्मणून जें औषध मिळतें, त्यामध्यें हींच औषधें असल्याचें बाहेर पडलें आहे.

पश्चिमेकडील न्हावी लोक तर "शिसें व चुना' ह्याचाच उपयोग करितात असें ह्मणतात. कांहींजण काडीखाराचें मिश्रण (१० ग्रेन काडीखार व १ औंस शुद्ध पाणी) केंसास लावून नंतर पायरो ग्यालिक आसिडचें मिश्रणं लावितात.

परशीयन लोक केंस काळे करण्यासाठीं निळीचा उपयोग करितात. इजिप्त व तुर्कस्थानांतील लोक लिहिण्याच्या शाईसारखा लोह व पायरोग्यालिक आसिड मिश्र कलफांचा उपयोग करितात. ह्यासारखेंच मिश्रण हिराकस (सल्फेट आफ् आयर्न) व हिरडे (ह्यामध्यें पायरोग्यालिक आसिड पुष्कळ आहे) ह्यांचें होतें. ह्मणजे जवळ जवळ आपली लिहिण्याची शाई हा एक कलफच होय. पश्चिमेकडील लोक मात्र कलफाचे कामीं मुख्यतः पारा, शिसें, रुपें, सोनें, बिसमथ, लोह, तांबें, इत्यादि धातूंचाच उपयोग करितात.

सर्वांत, शिसें हें फारच स्वस्तें व वापरण्यास सोपें असल्यामुळें कलफाचे कामीं ह्याचाच अतिशय उपयोग होतो, नुसत्या शिशयाच्या फणीनें रोज केंस विंचरले असतां त्यांचा काळा रंग होतो. परंतु तसें होण्यास पुष्कळ दिवस लागत असल्यामुळें आक्साईड आफ् लेड व चुना ह्यांचें पाण्यांत घट्ट मिश्रण करून केंसास लावितात. हें मिश्रण रात्रीं केंसास लावावें व त्यापासून निघालेली वाफ निघून जाऊं नये ह्मणून वर एक मेणकापडाची टोपी अथवा आच्छादन घालावें. सकाळीं केंसावर वाळलेलें मिश्रण काढून टाकून कांहीं सुगंधी तेल लावून केंस विंचरून साफ करावेंत. केंसास किंचित् उदी अथवा तुळतुळीत काळा रंग पाहिजे असल्यास वरील मिश्रण पाण्यांत न करितां दुधांत करावें.

कलफ लावण्यास रात्रच चांगली, कारण दिवसापेक्षां रात्रीं अधिक गंधक केंसांतून बाहेर पडतो, असा समज आहे.

आसिटेड आफ लेड १ ड्राम, २ ड्राम शुद्ध गंधक व सुमारें १० औंस पाणी घेऊन मिश्रण तयार करावें. हें मिश्रण वर सांगितल्या प्रमाणें रात्रीं केंसास जरूरी प्रमाणें लावावें. हें मिश्रण सोपें असल्यामुळें ह्याचाच सांप्रत पुष्कळ लोक उपयोग करितात.

मि वि.

—:0:—

### शिककाई ऊर्फ साबण

शिककाईचे अंगीं साबणाप्रमाणें फेस येण्याचे व अंग किंवा वस्त्रें स्वच्छ करण्याचे धर्म आहेत, ही गोष्ट ज्यास माहीत नाहीं असा मनुष्य विरळा. अनादि काळापासून तिच्या अंगच्या ह्या गुणांचा आह्मी उपयोग करीत आलों असून, आतां मात्र, साबणानें तिला इतकें मागें टाकलें आहे कीं, बायमुलांनासुद्धां साबू व तोही थेट बिलायती पाहिजे, यामुळें अर्थशास्त्रदृष्ट्या देशाचें केवढें तरी नुकसान होत आहे? उपाय नाहीं तेथें विदेशी पदार्थ उपयोगांत आणणें भाग आहे, परंतु तसा प्रकार साबणाचा नाहीं. शिककाई त्याचें उत्तम काम करिते, पण, अडचण एवढीच कीं, ती आणून कुटून व शिजवून उपयोगांत आणण्याच्या खटाटोपीमुळें आयत्या तयार साबणाचा उपयोग करणें लोकांस आवडतें. करितां निदान यंत्रानें ती बारीक कुटून तिच्या दाबानें पाण्यांत सहज विरघळतील अशा वड्या करून विकण्याची कोणी सोय केल्यास देशाचा मोठा फायदा व लोकांची सोय होणार आहे. साबण तयार करण्याची कृती. पूर्वींच्या ऋषींना ठाऊक होती हें वाचून पुष्कळांना आश्चर्य वाटेल. पण हें सत्य आहे. कांहीं वनस्पतींची राख घेऊन शिंपा जाळून केलेला चुना, आणि गाढवाचें मूत यांशीं तिचें चांगलें मिश्रण करावें, आणि नंतर त्यांत मोहरीचें तेल घालून तें कढत ठेवावें व त्यावरची साय काढून घ्यावी. या साईचा उत्तम साबण होतो.

### मानवी मापन

॥ न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः॥

ज्या प्रमाणें महासागराच्या पोटांत अनंत महारत्नें व गारगोट्या भरलेल्या आहेत त्याच प्रमाणें ह्या जीवित सागराच्या पाण्यांत अमृत आणि विष या दोहोंचीहि भेसळ करून दिली आहे. ह्यांत अमुक एक बिंदु अमृताचा वा विषाचा आहे असा निर्णय आपणांस करितां येत नाहीं. 'किममृतमयः किं विषमयः' हेंच संसाराचें खरें सार आहे. संसार हा असारहि नाहीं व ससारहि नाहीं. सर्वस्वी दुःखमय किंवा सर्वस्वी सुखमय अशी वस्तू आपल्या मानवी दृष्टीच्या बाहेरची आहे. प्रत्येक गोष्ट सुख दुःखाच्या रसांत ओतून आपल्या पुढें मांडलेली आहे. जी गोष्ट क्षणैक संतोष देते तीच क्षणांत दुःखास कारणीभूत होते. ज्या प्रमाणें पांढऱ्या रंगांत सप्तरंग एकवटलेले असतात त्याच प्रमाणें सर्व वस्तूंत सुख दुःखाचे रंग एकवटलेले आहेत. उष्णता किंवा थंडी हे गुण निराळे काढून दाखवितां येत नाहींत. खरें पाहतां सर्वच उष्णता किंवा सर्वच थंडी आहे. आपलें मापन तुलनेवर आहे. शून्य अंशा खालींहि पारा गेला तरी ती उष्णताच आहे व शंभारावर गेला तरी उष्णताच आहे. आपल्या मापना साठीं मात्र आपण दोन निरनिराळीं नांवें देतो इतकेंच. बाकी उष्णता व थंडी हा भेदाभेद सूक्ष्म विचारांत दिसणारच नाहीं. ह्याच प्रमाणें संसारांत सर्व विषच आहे ह्मटलें काय किंवा अमृत आहे ह्मटलें काय एकच. विष ह्मणजेच अमृत आणि अमृत ह्मणजेच विष. ह्या दोन वस्तू नसून एकच वस्तू आहे. पण आपल्या मापनासाठीं आपण कांहीं डिग्री पर्यंत सुख ह्मणतो व पुढें दुःख ह्मणतो.

प्राणि मात्रास जीव अत्यंत प्रिय आहे. जिवा पेक्षां दुसरी प्यारी चीज कोणचीहि नाहीं. त्यास दुःखकष्ट होऊं नयेत व तो निरंतर सुखांत राहावा अशी त्याची फार इच्छा असते. ह्या जिवास आनंद विण्यासाठीं, त्याचें रंजन करण्यासाठीं तो त्याचे नाना चोज करितो व त्याच्या पायीं आपलें सर्व आयुष्य वेंचितो. काय चमत्कार आहे पहा, कीं, जीवास कष्ट होऊं नयेत ह्मणूनच जिवास कष्टवावें लागतें, जिवास सुख होण्यासाठींच दुःख काढावें लागतें. त्याचे विश्रामासाठींच जिवास श्रमवावें लागतें, किंबहुना, जीव रक्षणासाठींच जीव खर्चीं घालावा लागतो. झाडा पासून बी आणि बी पासून झाड तद्वत् सुखा पासून दुःख व दुःखा पासून सुख असें रहाट गाडग्याचें चक्र चालूं आहे. संसारांत जी गोष्ट आपण ज्या प्रसंगीं ज्या दृष्टीनें पहातों तशी ती त्यावेळीं दिसते. सुखाचा व दुःखाचा एकच लांबचा लांब कधीं न संपणारा असा रस्ता आहे. त्याच्यावर आपल्या सोयीसाठीं आपण मैला मैलाचा धोंडा पुरलेला आहे. संबंध वस्तु आहे तीच आहे. वस्तू निरनिराळी होत नाहीं. आपल्या डोळ्यांत ती एकदम मावत नाहीं ह्मणून आपणास तिचें भाग विभागानें परीक्षण करणें भाग आहे ह्या भागास मनुष्य आपल्या सोयी प्रमाणें नावरूप देतो. परंतु एकदम सर्वांगानीं वस्तूचें ईक्षण केल्यास आपला भेदाभेद निरर्थक होईल. ह्मणजे

॥विनिश्चेतुं शक्यो न सुखमितिवा दुःखमितिवा॥

असा आपला घोटाळा उडून जातो तो जाणार नाहीं. आपला घोटाळा होतो व त्यामुळें सुख आहे कां दुःख आहे याचा निर्णय होत नाहीं. याचें मुख्य कारण, आपण ती गोष्ट एक समयावच्छेदें करूनच एकदमशी व विभागानें पाहतों हेंच होय. ज्यावेळीं ती विभागानें पहावयाची त्यावेळीं आपण ती एकदम पहूं लागतो व एकदम पहायाची तेव्हां विभाग करितो ही चूक होते. वस्तुतः वस्तूचें खरें सर्व स्वरूप एकच आहे.

हीच विचारसरणी जरा खोल व दूर नेली तर एकच तत्व कसें सर्व व्यापी आहे याचा चांगला उलगडा पडेल. सर्व वस्तु मृत्तिका आहेत. कौलें, व विटा, ह्यांत एकच तत्व (मृत्तिका) आहे. पण आपल्यासाठीं आपण कौलें निराळीं व विटा निराळ्या हा भेद करितो. अशाच रीतीनें यच्चावत सर्व वस्तूंत एकच तत्व (अर्थात तें अविनाशी, ज्यास आपण ईश्वरत्व ह्मणूं) आपणांस दिसेल.

आपणांस त्या एक तत्वाची ओळख झाली ह्मणून आपण आपला भेद विसरणें हेंहि वाजवी होणार नाहीं. आपल्या दृष्टीचा भेद हाहि खोटा नाहीं. मनुष्याच्या मापनासाठीं हे भेद अत्यंत जरूरच आहेत. किंबहुना ह्या भेदावांचून आपलें चालणार नाहीं. एखाद्याचा आप्त मृत झाला व तो शोकाकुल होऊं लागला ह्मणजे आपण त्याचें समाधान करितो कीं, अरे वेड्या, रडतोस काय? तुझा तो जिवलग नाहींसा थोडाच झाला, तो अनंत स्वरूपांत आहे तसाच आहे. परंतु तो जो रडतो तो तें दृश्य स्वरूप अदृश्य झालें ह्मणूनच रडतो. त्याला तें आपल्या दृष्टिपथाच्या बाहेरचें अनंत स्वरूप नको आहे त्याला तें त्याचें बाह्य रूपच हवेंसें असतें, व तें त्यास दिसेनासें झालें ह्मणून त्यानें रडणें सहजिक आहे. रडणें व हसणें ह्या दोन्ही क्रिया आपल्याच मापनाच्या आहेत. आपणांस आपल्याच मापांनीं मोजलें पाहिजे. आणि ह्मणूनच आपण रडतो व हसतो (ही जरी एकच सूक्ष्म स्थिती आहे तरी) हेंहि तितकेंच बरोबर आहे. मुद्दा इतकाच कीं, एकतत्व ओळखून भेद पहावेत, व भेद आळखून एकत्व पहावें.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ९ शके १८२५

पुण्याचें टिळक-प्रकरण आणखी किती वर्षे चालणार आहे हें कळत नाहीं. या प्रकरणांत एक मोठाच प्रश्न निघाला होता. आरोपी तर्फे रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे साक्षीदार आहेत. त्यांच्यावर साक्षी-समन्स निघालें होतें. ते फार सरळ स्वभावाचे असल्यामुळें साक्षी साठीं पुण्यास जाणार होते, परंतु दिल्ली-दरबाराहून नुकतेच परत आले होते व प्रकृती ठीक नव्हती म्हणून यांनीं पुण्याच्या कोर्टास वकिल मार्फत विनंती केली. तथापि माजिस्ट्रेट मि० क्रोट साहेब यानीं त्यांची साक्ष कमिशन मार्फत घेण्याचा नकार केला, व पकड वारंट काढण्याचा ठराव केला. असा हुकूम झाला तेव्हां त्याचें पर्यवसान पाहण्याचीच वेळा आली. राजश्री खापर्डे वऱ्हाडात राहतात, वऱ्हाड प्रांत हा ब्रिटिश मुलूख नाहीं आणि म्हणूनच हें साक्षीचें पकड वारंट त्यांच्यावर बजावण्यांत येऊं नये असा प्रश्न उद्भवला. हा वाद राजकीय स्वरूपाचा आहे. माजिस्ट्रेट साहेबांचा विशेष आग्रह वारंटच बजावण्याचा दिसला. यांचा गर्भित हेतु कांहींहि असो पण यांस असें वाटलें असावें कीं हा प्रांत कायमच्या पट्ट्यानें ब्रिटिश अंमलाखालीं नुकताच आला आहे तेव्हां हा ब्रिटिश प्रांत समजला पाहिजे आणि पकड वारंट बजावण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं. हा वाद मुंबई हायकोर्टापुढें निघाला; पण या नामदार कोर्टानें हा प्रश्न वऱ्हाडच्याच हायकोर्टाच्या निकालावर सोंपविला. आम्ही मागें ध्वनित केल्या प्रमाणें हा प्रश्न वऱ्हाडच्या हायकोर्टानें शेवटीं निकालास लाविला हें कळविण्यास आनंद वाटतो. हा प्रांत निजाम सरकारचा आहे आणि 'ब्रिटिश इंडिया' या सदराखालीं येत नाहीं. या ठरावा अन्वयें साक्षीचें पकड-वारंट परत करण्यांत आलें. हा निकाल यथान्याय झाला आणि याहून वेगळा निकाल होण्याला जागाच नव्हती; परंतु कित्येकांच्या मनाला मोठी शंका वाटत होती. अखेरीला ही शंका अनाठायी ठरली, पकड-वारंट रद्द झालें आणि या पुढें राजश्री खापर्डे यांची साक्ष पुण्याच्या माजिस्ट्रेट साहेबांस कमिशनाच्या मार्फतीनें घ्यावी लागेल. एकंदरीनें, हा राजकीय वाद टिळक-प्रकरणात उत्कृष्ट प्रकारें निकालास लागला ही समाधानाची गोष्ट होय.

## काळा-गोरा

आफ्रिके संबंधानें आमची ओरड आहे कीं तेथें इंडियनास गुलामा प्रमाणें वागवितात. गुलामगिरी देखील बरी कां कीं रोमन कायद्या प्रमाणें गुलामाला पुष्कळदां स्वतंत्रता देत असत व वारसाचाहि हक्क पोंचत असत. परंतु या सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत प्राचीन गुलामगिरी उत्पन्न केली आहे. इंडियनांस दक्षिण आफ्रिकेंत वसाहत करितां येत नाहीं, तिकडे कायमचें वास्तव्य मिळूं शकत नाहीं, जमीनजुमला पैदा करितां येत नाहीं; फार तर काय, इंडियनांस पुष्कळशा रस्त्यानें देखील जाण्याची मनाई आहे. दक्षिण आफ्रिकेंतल्या या प्रकारांना आपण हासतों आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांस ही लाजिरवाणी गोष्ट आहे असें म्हणतों. इंडियनासंबंधानें असें वैषम्य ठेवूं नये, म्हणून पार्लमेंटांत व इंडिया-कौंसिलांत पुष्कळदां चर्चा झाली व शुभंभवतु शुभंभवतु असे आशीर्वाद मात्र देण्यांत आले. अद्याप इंडियनांस समान हक्क मिळत नाहींत व त्यांच्या नशिबाची विषमता व गुलामगिरी हीं कांहीं दूर होत नाहींत.

हा काळा-गोरा भाव हाडा मांसागर्द्यें खिळला आहे. आम्ही इंडियन लोक जों जों राज्यकर्ते न्यायी, निष्पक्षपाती व दयाळू म्हणून त्यांची स्तुती करितों, राजभक्तीचीं मंत्रपुष्पें अर्पण करितों, व आपल्या कल्याणा विषयीं यांचो प्रार्थना करितों तों तों ते आपणाला दूर दूर फेकूं पाहातात. पूर्वीची कृपादृष्टी व सहज प्रेम हीं लयास चालल्या सारखीं दिसतात; आणि अतिशय परिचयानें व आपल्यां दुष्टावत चाललेल्या पंगूपणानें आपण निर्माल्यवत होऊं लागलों आहों. इंडियना संबंधाचा हा भेदाभेद नाहींसा होण्याचा संभव आह्मांस तर दिसत नाहीं. जों पर्यंत आपली गरिबी वाढत आहे, व गरिबी बरोबर आपली स्वतंत्रता, प्रामाणिकपणा, निस्पृहीपणा इत्यादि सद्गुण देखील अधिकाधिक नष्टप्राय होत चालले आहेत आणि जों पर्यंत आपल्याला राज्यकर्त्यांच्या हातापाया दिवसानुदिवस जास्ती पडावें लागत आहे तों पर्यंत आपल्या विषयीं यांच्या मनात मोठेपणा व आदरभाव तो कसला उत्पन्न होणार आहे हें उघड दिसत आहे. आपण तोंड पसरलें कीं आपलें पाणी राज्यकर्त्यांनीं लागलीच ओळखलेंच. कवी म्हणतात कीं,

॥न माग तयाची रमा होय दासी॥

हें म्हण पदोपदीं लक्षांत ठेवण्या सारखी आहे. आणि याच धोरणानें आम्ही राज्यकर्त्यांच्या कृपेला स्वतांस सत्पात्र केलें पाहिजे. राज्यकर्त्यांनीं देखील विसरतां कामा नये कीं, दक्षिण आफ्रिकेंतल्या प्रमाणें विषमता असंतुष्टतेला कारणीभूत होते, आणि प्रजेच्या असंतुष्टी सारखा भयंकर कोणताच बद्रोग राष्ट्रपुरुषाला असूं शकणार नाहीं.

## मंडूक-प्लुती

वरील काळागोऱ्याच्या मधील भेदाभेद सर्वत्रच आहे. इंडियन लहान माणूस आहे व आपण श्रेष्ठ पुरुष आहों असें प्रत्येक टोपीवाल्याला वाटतें. फार तर काय, पण नेटिवांसही असें वाटतें कीं किती झालें तरी फलाणा तो गोरा आहे व याच्यापुढें नेटिवाची काय कथा! हा लघुश्रेष्ठपणा पदोपदीं अनुभवाला येतो. विहिरींतील मंडूक जसे उंच उंच उड्या मारतात तसे हे साहेब लोक आपल्या खानगी वर्तनांत आपल्या श्रेष्ठपणाच्या भराऱ्या नेहमीं मारीत असतात. जी गोष्ट नेटिवानें केली तर गुन्हा होतो तीच साहेबानें केली तर ती सुखानें चालते. आफ्रिकेंत जे प्रकार घडतात त्याचें प्रदर्शन आमच्या आकोल्यासही पुष्कळदा होतें. आफ्रिकेंत इंडियनांस कांहीं चांगल्या चांगल्या रस्त्यांनीं जाऊं देत नाहींत आमच्या आकोल्यास देखील कांहीं सार्वजनिक रस्त्यांनीं नेटिवांच्या बैलगाड्या जाऊं शकत नाहींत. येथील सिव्हिल स्टेशनाकडून पूर्व भागाला ज्या सडका जातात या पैकीं पुष्कळांचा उपयोग कुणब्याच्या बैलगाडीला करितां येत नाहीं. चपराशी बंगल्यांतून धांवत येतो आणि म्हणतो कीं, गाडी परतवून लांबच्या रस्त्यानें न्या. ही सार्वजनिक रस्त्या संबंधाची तक्रार दूर होईल आणि ही मंडूक—प्लुतीचीं उदाहरणें लोकांपुढें पुनः येणार नाहींत अशी व्यवस्था आमचे डिपुटी कमिशनर लवकर करितील अशी आह्मांस उमेद आहे.

## मानसन्मान

मानसन्मान करण्याचा शिष्टाचार फार जुना आहे तो कांहीं इंग्रजींत उद्भवलेला आहे असें नाहीं. अलिकडे इंग्रजींतच साहेब लोकांचा मानसन्मान पुष्कळ ठेविला जातो पण ते मात्र मान करणाऱ्या लोकांस योग्य मोबदला देत नाहींत. असा प्रकार अधिकाऱ्यांच्या हातून पुष्कळ प्रसंगीं घडतो. सरकारी अधिकार हा असा बलवत्तर शुभ ग्रह असतो कीं तो जेथें तेथें त्या त्या अधिकाऱ्याचा मानसन्मान राखतो. अधिकारी मात्र त्या अधिकाराहून कधीं वेगळे होऊन स्वतांचें परीक्षण करीत नाहींत. जे लोक यांचा सन्मान राखतात यांना ते आपल्या विमल हासण्यानें किंवा मान हालविण्यानें देखील ऋणी करीत नाहींत. कित्येक साहेबांस कोणी सलाम केला नाहीं तर राग येतो, पण सलाम जर कोणी केला तर ते तो परत करण्याची देखील तसदी घेत नाहींत. सलाम केला तर तो घेतलाच पाहिजे असा शिष्टसंप्रदाय आहे. थोड्या वर्षांपूर्वी एकदा नामदार रेसिडेंट साहेब बहादूर वऱ्हाडांत येऊन परत जात होते तेव्हां यांस कुशल प्रश्न विचारण्यासाठीं पुष्कळसे संभावित गृहस्थ येथील स्टेशनावर गेले होते. साहेबानीं आपल्या डब्याचीं प्लाटफार्मच्या बाजूनीं दारें व खिडक्या हीं लावून घेतलीं होतीं. बिचारे सभ्य गृहस्थ आले तसे विन्मुख परतून गेले. थोड्या दिवसा पूर्वीं असेच एक बडे अधिकारी पेनशनीवर गेले. त्यांच्या साठीं वऱ्हाडच्या पश्चिमेकडील मोठ्या अखेरच्या स्टेशनावर आदरातिथ्याची चांगली तयारी करण्यांत आली होती. पांच सहा मिनिटांच्या शोभेसाठीं शंभर सवाशे रुपये खर्च करण्यांत आला होता. साहेबांस पूर्वींच तारेनें सूचनाही झाली होती. पण स्टेशनावर गाडी येतांच पहावें तर पहिल्या वर्गाच्या डब्यांत सर्व अंधार केलेला होता. खिडक्यांचीं दारें बंद केलीं होतीं. कोणी घोरत्ये करून दिवाबत्ती किरकिरी पण झोंपेनें सामसूम झाली होती. गाडी थोडक्यांत पुढें भुसावळेकडे चालती झाली व स्टेशनावरील सभ्य गृहस्थ श्रीमुखाची शोभा दाखवीत बरोबर परत गेले. ही गोष्ट काकतालीय न्याया प्रमाणें चुकून घडण्याचा संभव आहे ते साहेब फार चांगले होते अशा विषयीं आमच्या राजधानीच्या महंतांनीं सर्वांस विदित केलेंच आहे तेव्हां यांच्या विषयीं अशी शंका घेऊं नये. पण या उदाहरणावरून पुष्कळशा तद्विषयक गोष्टींचा समावेश करण्या सारखा आहे. महासाधूचा अनादर होईल पण सरकारी माणसाचा नैवेद्य चुकावयाचा नाहीं. हा मान त्या राज्यश्रीचा झाला पण तिच्या अनुग्रहानें जीं माणसें शोभा पावतात यांनीं आपल्या मोठेपणाला शोभेल असाच वर्तनक्रम ठेविला पाहिजे. जो कोणी दुसऱ्याचा सन्मान करितो त्याच्या मनांत दुसऱ्या विषयीं कृतज्ञताबुद्धि असते, थोरा विषयीं सन्मानबुद्धि असते आणि सरकारी अधिकाऱ्या श्री विषयीं पूज्यबुद्धि असते. सन्मान होत असतांना ते घेण्याला देखील कुशलता लागते. आपल्या ठायीं पूज्यभाव ठेवणाऱ्यांचा हिरमोड करण्यांत मोठेपणा नसतो. मानानें मान वाढतो. सन्मानाचा अंगीकार करितांना सन्मान करणाऱ्याचा बहुमान होणार नाहीं तर तो अंगीकार करणाऱ्याचा दोष खरा, पण त्यांत सन्मान करणाऱ्यांच्या अंगीं गुणग्राहकता नाहीं असाच अर्थबोध होतो. सरकारी अधिकाऱ्यांस त्यांच्या आगंतुक वर्चस्वाचा तोरा मोठा असतो असें पुष्कळांच्या वर्तनांत दिसून येतें. तर अशा कोटींतल्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्याचा घोंडा उचलण्यापेक्षां त्यांच्या छायेपासून दूर अंतरावर राहावें हें बरें! मानसन्मानाच्या बाबतींत आमच्या लोकांच्या फार चुकया होतात. त्यांच्या वाडवडिलांचा कित्ता त्यांनीं सोडूं नये, पण दुसऱ्याचा सन्मान करितांना आपलें मानधन चोरीस जाऊं देऊं नये.

## शिक्षणाचा मारा

आमच्या देशावर इंग्रजी आल्यापासून इंग्रजी विद्या फार वाढल्या आहेत. त्या विद्या शिकतां शिकतां आमचा जनसमाज टेकीला आला आहे इतकेंच नाही तर त्या शिक्षणक्रमाची यथायोग्य छाटाछाट होणार नाहीं तर हा विद्याक्रम नको म्हणण्याची वेळ लवकरच येईल. साधारणपणें दुनियेदारीला लागण्याचा काल १९।२० वर्षांचा होय. सरकारी कायद्यानें वयाचीं १८ वर्षे संपलीं म्हणजे मनुष्य कर्ता पुरुष होतो. पण ही मर्यादा विद्यमान शिक्षणक्रमानें अगदीं दूरवर फेंकून दिली आहे. इंग्रजी मधून विद्याभ्यास करावा लागतो आणि यामुळें जवळ जवळ वयाचीं २०।२५ वर्षे फुकट जातात. म्याट्रिक परीक्षा होईपर्यंतच बाळपण निघून जातें. ही परीक्षा म्हणजे ज्ञानमंदिराचा दरवाजा समजतात. आमच्या मतानें शिक्षण क्रम असा पाहिजे कीं सरासरी १९।२० वर्षांच्या वयापर्यंत शिक्षणक्रमांतली अत्युच्च पायरी गांठतां आली पाहिजे. ही परीक्षांची चक्की अगोदर बंद झाली पाहिजे. जे प्रथम इंग्रजी शिक्षणामुळें लाभणाऱ्या सांपत्तिक ऐश्वर्यानें फार पुढें झुकले त्यांनींच असा हा शिक्षण क्रम घालून दिलेला आहे. आणि याच शिक्षण क्रमांत आमचा तरुण

विद्यार्थी समूह लोळत पडला आहे व आपलें आयुष्य वृथा वेंचीत आहे. याचें कारण औद्योगिक शिक्षणाच्या, यांत्रिक शिक्षणाच्या व इतर व्यवहारोपयोगी शिक्षणाच्या शाळा उपलब्ध नाहींत. शिक्षणाचा एकच मार्ग विद्यार्थ्यांच्या गर्दीमुळें रोधला गेला आहे आणि अन्यत्र गती नसल्यामुळें त्याच मार्गानें ठेंचकळत व धडपडत फिरावें लागत आहे. यांत विद्यार्थ्यांचा दोष नाहीं. हा सर्व दोष प्रस्तुतच्या कर्त्या पुढारी मंडळीवर आहे.

## प्राचीन माहिती

जुन्या इमारती, किल्ले, देऊळें, इत्यादिकांच्या अवशिष्ट रचनेवरून जुन्या इतिहासाचा कांहीं कांहीं शोध लावीत असतात. ज्या कालाचा इतिहास उपलब्ध नाहीं त्या कालाची माहिती जुने शिलालेख, ताम्रपट, नाणीं, अवशिष्ट इमारती इत्यादिकांवरून काढण्याची निराळी विद्याच आहे. आमच्या प्रांतीं अशा प्रकारच्या शोधाला स्थळें फार थोडीं आहेत; तथापि त्यांचा उल्लेख गेल्या १९०१-०२ च्या राज्यकारभाराच्या रिपोर्टांत केला आहे. या लेखाच्या आधारें कांहीं माहिती आम्ही आज देतों.

पातुरास शेखबाबूचा दर्गा व नानासाहेबांचा मठ आहे. हीं दोन्ही स्थळें पवित्र आहेत. इमारती साधारण आहेत. कांहीं खांबावर लेख दिसतात परंतु ते वाचतां येत नाहींत. हा मठ जैनपंथी लोकांनी बांधला असावा असें मि. काऊसेन्स साहेब म्हणतात. शेख बाबूच्या राऊळांत एक लेख आहे, त्यावरून ही इमारत १३८९ इसवी मध्यें बांधलेली असावी. दरवाज्यावर जो लेख आहे तो असें सांगतो कीं बैरामखानाचा मुलगा खान-इ-खानान याच्या कारकिर्दीत १६०६ मध्यें तो दरवाजा बांधला असावा. या शिवाय विशेष महत्वाच्या गोष्टी या इमारतीवरून कळत नाहींत.

जुने शोध लावणाऱ्या इमारती मध्यें हेमाडपंती देऊळें, बाळापूरची छत्री व किल्ला, सिरपूरचें अंतरिक्ष पार्श्वनाथाचें देऊळ, गाविलगडचा किल्ला, नरनाळ्याचा किल्ला, फत्तेखेडा, व रोहिणखेड येथील मशिदी इत्यादि इमारती पाहण्या सारख्या आहेत.

हेमाडपंती देवळांची आख्यायिका अशी सांगतात कीं, हीं देऊळें एका रात्रींत बांधण्यात आलीं. यांची बांधणी राक्षसाच्या हातून घडली आहे असें म्हणतात. राक्षसांसाठीं हेमाडपंतांना ही कामगिरी शोधून काढावी लागली अशी दंतकथा आहे. वस्तुतः हेमाडपंत हे ब्राह्मण होते. यांच्याकडे देवगिरीच्या यादव राजाची दिवाणगिरी होती. ते अवेरच्या रामदेव राजाच्या वेळीं दिवाण होते. हेमाडपंतांचा लौकिक त्यांच्या कायद्याच्या ग्रंथाबद्दल आहे. त्या शिवाय ते इमारती बांधण्याच्या कामाला मोठा राजाश्रय देत असत हेमाडपंती देऊळांवरून बोध इतकाच घ्यावयाचा कीं यादव राजांच्या कारकिर्दीत शिल्प शास्त्राला सर्वोत्कृष्ट उत्तेजन मिळालें. हेमाडपंती देवळांची रचना द्राविक आहे; आणि ती पुष्कळांच्या पाहण्यांत आली असेल. आमच्या प्रांतीं किंत्येक देऊळांत सौंदर्य कोठुंही दृष्टीस पडेल. चांगलीं

...णावतात, इ

पाहण्या सारखीं देऊळें लोणार, मेहकर, बारशीटाकळी, व पुसद येथें आहेत. यवतमाळ लोहारा, लाडखेड, महागांव व कोथळी यांतील देऊळें देखील चांगलीं आहेत. बारशीटाकळीचें देऊळ ११७६ सालीं बांधण्यांत आलें असावें असें तेथील शिलालेख सांगतो.

( पुढें चालेल )

## The Berar Samachar

MONDAY APRIL 20 1903

WE have referred in our last number to the special advantages of the Batai system. We wish now to point out the great fall in the cultivation of the Rabi crops. This fall implies an abnormal rise in the Kharip crops. Those who cultivate land at a fixed amount of the lease—money take care to realize the earliest crops that can be raised with the least amount of labour and the smallest cost of cultivation. The earlier the crops are realized the better. Jwari is sown because it is the staple article of food. Their interest is not to wait till the winter-crops are harvested. Besides many of the land less labourers do not like to run the risks of the uncertainty of rain. The recent famines have brought new experiences to further accelerate the causes of a growing deterioration. The Rabi crops are sown late and come up very late in view of the harvest of the autumn crops. We have seen the necessity of some protective measures for inducing the people to sow wheat, gram, linseed and other Rabi crops. Unless this is done with a liberal hand there is no likelihood that the people will take to the winter—crops of their own accord. Some concession is needed for those who allot some land each year for the Rabi crops. There is the gradual disappearance of these crops and if no saving measure be introduced there is every possibility that there will be hardly any sowing operations in the winter. This continual fall in the winter—crops inplies abnormal rise in the autumn ones. This state of things is fatal to the fruitfulness and richness of the soil. The annual rotation of Kharip and Rabi crops brings new fertility to the soil. Our soil has now become a stranger to this inherent improvement that results from the simple process of rotation between the crops of the two consequitive seasons of the year. The soil loses thus in quality and fertility and the present rotation between the cotton and jwari crops does not bring back to the soil what is lost in the disappearance of the Rabi—crops. We request the Government to see that this growing evil is remedied at the earliest opportunity. The only way to do it is to give some concessions by way of a small percentage of remission in the land—revenue. We hope that the Government will not let mattess drift in the present disadvantageous manner. The Batai system should be made the standing rule of the rights of occupancy if the holder of land does not cultivate it himself and there should be special facilities for the introduction of the Rabi crops. Let us hope that some thing will be done in the immediate future.

—:0:—

THE 'European control' of every branch of administration is the most plausible argument of the Government to uphold the undue introduction of the English people in the higher ranks of service. This introduction of the ruling classes means to that extent a total exclusion of the Natives from the highest posts in the public service to which they are otherwise entitled by the Indian Magna Charta that is embodied in the proclamation of Victoria the Good. We wish that every differentiation by race, creed and color should be altogether abolished. The Bengalee observes in this strain in connection with the Police Commission:—

" Whather the carrer at present offered to natives in the Police is sufficiently attractive to induce the proper stamp of men to enter it, and if not, what steps can be taken to remedy this evil, *consistently with the recognized measure of necessity for European control in the District changes.*' The italics are ours. They call for comments. In our ignorance, we desire to ask by whom was " the recognized measure of necessity for European control " fixed—who " recognized " this necessity? Was it the Government of India—or was it the Commission? If it is the Government of India, we should like to have chapter and verse. We have searched in vain for the authority of the Government of India in support of this extraordinary proposition. If on the contrary this " recognized measure of necessity " amounts to nothing more than the *Dictum* of the Commission, we venture to dispute it. The Commission, have no right to lay down a principle or a policy of such far—reaching character affecting the prospects of His Majesty's Indian subjects and raising a barrier against their wider employment, and that on racial grounds which are opposed to the terms of the Proclamation. But that such a question should have been put by the Commission, has created a painful impression, and grave misgivings are entertained as to the Report being satisfactory or as being calculated to improve the efficiency of the Police or do justice to the wider employment of the people in its higher officers. "

—:0:—

Here is a noble advice from the lips of Babu Surendranath Bannerj to the students who served as volunteers at the Bengal Provincial Conference.

" You have been good enough to refer to the deep interest that I take in the spiritual and moral advancement of the students. I am indeed wedded to politics. Politics is my food, my raimant, the very vital air which I breathe. But all, the same, I believe in my herat of hearts that there can be no polital enfranchisement unless and until it is accompanied or preceded by moral and spiritual advancement. The mind, the spirit, the soul must be disenfranchised. Their fetters must be removed The mind must be elevated to a higher level, to a nobler environment. Then and then only, will free institutions become the heritage of our people. It has been remarked by a distinguished writer that a noble people cannot live under an ignoble Government and that an ignoble people can hardly, expect to have a noble Government. The Government of a country in the long run is very muc what the people deserve. Let us by our moral and spiritual regeneration deserve the free political instutions which we crave for and when that regeneration has been accomplished, no power on earth will be able to withhold from us the just tribute of our higher and nobler nature.

" Students, we desire to leave that work to you as a legacy. You must qualify yourselves for that splendid bequest. It will be a moral qualification. You must pass through a period of moral apprenticeship. Cultivate truthfulness, cultivate the spirit of manly independence; cultivate hatred of wrong and oppression, whether perpetrated upon man in his individual or in his collective capacity. Regenerate the inner man. Elevate your surroundings. Live in the atmosphere of the Gods, fragrant with the breath of the celestials or mankind, in those divine heights consecrated and illumined by the presence of a Jesus, a Mohamed, a Budha and a Chaitanya; then and then only will you have established your claims to the political redemption to which we aspire and which when accomplished, will be the most notable feature in the modern life of our ancient people. "

## वऱ्हाड.

हवामान— ऊन फार प्रखर आहे. गेल्या दोन तीन दिवसांत हवामान एकदम बदललें. उष्मा अधीक होऊं लागला, ढग पुष्कळ जमले व किरकोळ पाऊस पडण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. पारा ७८ अंशापासून ११० अंशा पर्यंत चढतो. प्लेगाचें मान दररोज दोन तीन मृत्यूवर येऊन बसलें आहे.

मे. फ्रान्सिस साहेब डायरेक्टर आफ लॅंड रिकार्डस यांस ग्वाल्हेर संस्थानांत सर्व्हे कमिशनरची जागा मिळाल्या कारणानें ते या आठवड्यांत तिकडे रवाना झाले. त्यांच्या तिकडील चाकरीची मुदत दहा पंधरा वर्षांची आहे तव्हां बहुत करून त्यांस पुनः वऱ्हाडांत परत यावें लागणार नाहीं.

आज पासुन आकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे. अंत्री मलकापूरचा खुनी मोकदमा येत्या बुधवारीं सुरू होणार असुन आरोपी तर्फे मि० ब्रानसन बारिस्टर काम चालविणार आहेत.

## नोटीस

रा. रा नानूराम मेघराज मारवाडी साहू दुकान कुटास पोस्ट दहिहंडा यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे माझे कडे तिकीट वहीवर सहीचे रुपये ४५० त्या रुपयास सरासरी ९ महिने झाले त्याचे व्याज ४० एकुण ४९० व बायसकाराचे वावराचे व बैलमारीचे वावराचे वायद्याचे रुपये ७५ व कुकट्याचे वावराचे नफ्याचे रुपये १७५ एकंदर एकुण रुपये ७४० तुमचे मला देणें आहेत. व त्या पैशाबद्दल मी तुम्हाला माझे घरचा कापुस खंडी १८ दर ४४ प्रमाणे दिला आहे. माझे कपाशीचे रुपये ४९२ झाले आहत. माझ्या मतानें माझे रुपये ५२ तुमचे कडे शिलक निघतात. मी तुमचे येथें दोन तीन वेळ हिशोब करण्याकरितां आलों परंतु तुम्ही हिशोब करीत नाहीं करितां नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझा हिशोब करून राहिलेली बाकी व पावती आम्हाला द्यावी, नोटिसी प्रमाणें व्यवस्था न केल्यास कोर्ट मार्फत दावा करून सर्व खर्चासुद्धां योग्य ती दाद मिळविण्यात येईल. कळावें, तारीख १९-४-१९०३ इसवी.

सही

परशराम वल्लद वनसिंग राहणार गरसोळी ता. आकोट पोस्ट— दहिहंडा. दस्तुर खुद्द"

—:0:—

**चमत्कारिक चाल**— चिनी लोक कुशल विचारतांना एकमेकांना मोठा गौरव करितात. विचारणारा दुसऱ्याची व त्याच्या संबंधीं सर्व कांहींची मोठी स्तुति करितो, परंतु आपली अगर आपल्यासंबंधीं सर्वांची मोठी निर्भत्सना करितो. याचा एक मासला:-

आपलें सन्माननीय नामाभिधान काय ?
माझें कः पदार्थ नांव वँग.
आपला भव्य राजवाडा कोठें आहे ?
माझें पडकें एवढेंसें खोपटें साचु येथें आहे.
तुह्मांला शूर व पराक्रमी मुलें किती आहेत ?
मला पाजी, हरकट पांच कारटीं आहेत.
आपल्या सुशील गृहिणीची प्रकृति कशी आहे !
माझी कृत्या, दुष्ट, थेरडी बरी आहे.

**ढेंकूण काम शिकले**- प्राण्यांना माणसाळून त्यांचे गुणधर्म पाहणाऱ्या शास्त्रवेत्यांपैकीं बर्न येथील डा. हरश्चमन हे फारच विलक्षण दिसतात. रूप साहेबांच्या प्रचंड घण ऐरणी यंत्राचे नमुन्यावर त्यांनीं एक सूक्ष्म यंत्र तयार केलें असून तें चालविण्याचें काम त्यांनीं पाळलेल्या ढेंकणांस शिकाविलें आहे ! डाक्तरांनीं इशारत करतांच एक ढेंकूण आपल्या जागेंतून बाहेर येऊन कळ दाबतो कीं घण वर जातो; दुसरे दोन ढेंकूण पुढें येऊन एक बारीक कांब ऐरणीवर ठेवतात. नंतर पुनः पहिला ढेंकूण बाजूस झाला कीं घण तीवर पडतो !

**पिवळे चष्मे**- नेम मारण्याच्या कामीं पिंवळ्या भिंगाचे चष्मे वापरल्यास शेंकडा ३० प्रमाणें अधिक नेमानें गोळ्या मारतां येतात असें नुकतेंच रशियन तोफखान्यावरील अधिकाऱ्यांनीं त्या संबंधाचे बरेच प्रयोग करून पाहून ठरविलें आहे.

**जमिनींत दुकानें**-फ्रान्सांतील एपर्ने हें शहर शांपेन दारूविषयीं प्रख्यात आहे. ह्या दारूचीं दुकानें भर रस्त्यांतून नसून जमिनीखालच्या खडूच्या कठीण खडकांतून पोंखरलेल्या गुहांतून आहेत ! व ह्या दुकानांचे रांगेमधून मैलचे मैल लांब पोखरलेले रस्ते केले आहेत !

**एक रशियन चाल**- जेव्हां एखादें रशियन कुटुंब एका घरांतून दुसऱ्या घरांत राहण्यास जातें, तेव्हां घरचा कर्ता पुरुष आपल्या बरोबर जुन्या चुलींतली थोडी गरम राख घेऊन जातो.

**नवीन शोध**-' रॅडियम ' नांवाचा एक खनिज पदार्थ एका शास्त्रवेत्यानें शोधुन काढला असून ह्या पदार्थाचे सूक्ष्म परिमाणू अनंत प्रकाशमय आहेत. अंधारामध्यें एक प्रकारचा विशेष तऱ्हेचा पडदा तयार करून त्याजवळ हा पदार्थ नेला असतां तो पडदा लहान लहान ताऱ्यांच्या टिकल्यांनीं चमकूं लागतो.

**सूचना**— राष्ट्रीय सभेबरोबर जसें प्रदर्शन भरतें तसेंच कुस्त्या, दांडपट्टा, बोथाटी वगैरे राष्ट्रीय खेळ व्हावेत अशी सूचना झाली आहे.

**इच्छा शक्ति**- अभ्यासानें इच्छाशक्ती प्रबळ केली असतां दिव्य-दृष्टीचीहि सिद्धी होते. कांहीं वेळ मन एकाग्र करून इच्छाशक्तीचा जोर विशेष प्रबळ केल्यानंतर, आपल्या गालांत व हातांत रक्त न निघतां दाभण खुपसून घेणारा एक युरोपियन मनुष्य होता.

फ्रान्सांतील तरुण स्त्रिया ता. १ फेब्रवारी रोजीं रात्रीं निजण्यापूर्वीं दोन पेटवून ठेवलेल्या मेणबत्त्यांचे मध्यें एक आरसा ठेवतात; रात्रींचे १२ चे ठोके पडतांच त्या जाग्या होतात; व उठून उजवा पाय पुढें टाकून आरशाकडे जाऊन शांत पाहतात; व त्यामध्यें त्यास इच्छा शक्तीमुळें आपल्या भावी पतीची मूर्ति दिसते !

**चांगली सोय**—मध्यप्रांतात २५ रुपयाहून कमी पगाराच्या सरकारी नोकर लोकांनीं प्लेग दूषित झालेल्या भागात राहूं नये ह्मणून गांवाबाहेर झोपड्या बांधण्या करितां यांना लागणारा खर्च (किती?) सरकार देईल असें स्थानिक सरकारनें ठरविलें आहे. ही सोय सर्वत्र होईल काय ?

**रंगाचा परिणाम**— निरनिराळ्या रंगांचा आजारी किंवा वेड्या मनुष्यावर निरानिराळा परिणाम होतो असें अनुभवास आलें आहे. इतालींतील अलेसाड्रीयाच्या वेड्यांचे इस्पितळांतील एखादा वेडा फारच अनावर झाला ह्मणजे त्याला निळ्या रंगाच्या भिंती व निळ्या भिंगाच्या खिडक्या असलेल्या कोठडींत कांहीं वेळ कोंडून ठेवतात, ह्मणजे तो शांत होतो ! कांहीं वेड्यांना जीव नकोसा होऊन अन्न खाऊं नयेसें वाटतें; अशांना तांबड्या रंगाच्या खोलींत कांहीं वेळ ठेवतात, ह्मणजे ते थोडेसे बेतावर येतात.

**दुःख नाहींसें करणें**— एका रशियन डाक्टरानें नवीन शोध लावून त्याचा अनुभवही घेतला. शस्त्रक्रिया करितांना रोग्यास क्लोरोफार्म देण्या ऐवजीं ती गोष्ट केल्यास फार सुखावह होईल असें त्याचें ह्मणणें आहे. त्यानें निळ्या रंगाच्या उजेडांत रोग्यास ठेवून कांहीं एक दुःख न होतां वीस मिनिटें पर्यंत त्याजवर ऑपेरेशन केलें.

**नवीन रंगाचा दिवा**—भिंगाच्या एका मोठ्या कुपींत अतून सीरा व जिलेटिन यांमध्यें कांहीं रोगजंतु मिसळून त्याचा थर द्यावा, या नंतर दोन दिवसांनीं त्या जंतूंची वाढ होऊन त्यांचे शरीरांतून स्वच्छ निळसर-हिरवा प्रकाश २।३ आठवडे पडतो ! या दिव्यानें खाणींत किंवा दारूखान्यांत अपघात होण्याची भीती नाहीं, असे प्रेगचा प्रो. हंस मोलीश यानें विएन्नाच्या शास्त्रज्ञ मंडळीला कळविलें आहे.

**गमतीचा ठराव**—करीमगंजचें सब डि० ऑफिसर मि. साकल्ड यांनीं साक्षीदारानें भितीकडे तोंड व वकिलाकडे पाठ करून साक्ष द्यावी, असें ठरविलें आहे. कारण वकिलाचे तोंडाकडे पाहून खरी साक्ष येत नाहीं !

**विलक्षण चमत्कार**- बेळगांवच्या श्री सोमनाथाच्या देवालयांत १९ दिवसाखालीं दोनप्रहरीं ३ वाजण्याच्या सुमारास एक नागसर्प अकस्मात येऊन देवासमोर खांबास टेंकून डुलत बसला. त्याला पाहावयास शेंकडो लोक जात व त्याचे जवळ उभे रहात, तरी तो कोणाच्या अंगावर जात नसे. या प्रमाणें तो रात्रौ ११ वाजेपर्यंत बसला होता. त्याची लोकांनीं पूजा वगैरे केली. एखाद्यानें काठी वगैरे उगारली तर तो नम्रपणानें मान खालीं करून स्तब्ध पडे !

## अत्युत्तम उदाहरण—

व्यापारी व आद्योगिक शिक्षण देण्याकरितां कांहीं महत्वाची व्यवस्था करण्यासाठीं म्हैसूरच्या महाराजांनीं आपल्या दिवाणास मंजूरी दिली आहे. कापड विणण्याचा धंदा ज्या ज्या जागीं पुष्कळ चालतो तेथें हा धंदा शिकविण्याच्या शाळा स्थापन करण्याचा हुकूम झाला आहे. रेशमाच्या कोशिंब्याचे कारखाने, लोखंडी काम सुतार काम, इत्यादि धंदे शिकविण्यासाठीं कांहीं ठिकाणीं शाळा उघडल्या जातील. उत्तेजनादाखल व या कलांचा अभ्यास विद्यार्थ्यांना मुंबईस करण्यास मदत व्हावी या हेतूनें मुबलक स्कालरशिपाही ठेवण्यांत आल्या आहेत.

## जुलमी अमानुष कृत्यें-

कांगोस्टेटमध्यें बेलजिअन लोकांची वागणूक कांहीं विलक्षण आहे. ते तेथील एखाद्या रहिवाशाला एखाद्या खांबाशीं बांधून ठेवितात आणि साऱ्या रात्रभर त्याला तसाच राहूं देतात. अशा स्थितींत राहिल्यामुळें अर्थातच सकाळाला तो मनुष्य मरून जातो. सकाळीं बेलजिअन लोक त्याच्या भोंवतीं जमतात. आणि त्यानें टांगून घेऊन आपला जीव दिला असें ह्मणून मोकळे होतात !

एका नेटिवाला त्यांनीं जमिनींत जिवंत गळ्यापर्यंत पुरलें. आणि त्याचे भोंवतालची माती खच्चून घट्ट बसवून टाकली. नंतर त्या माणसाला तहान लागली ह्मणून तो पाणी मागूं लागला. तेव्हां तेथील युरोपियन लोकांनीं त्याला पिण्याचें पाणी न देतां त्याच्या ऐवजीं लघुशंकेचे पाणी दिलें.

एकानें आपल्या हाताखालील एका सार्जंटला एका मुलीला चाबकानें मारण्याविषयीं हुकुम केला. अखेरीस त्या मुलीची सालडी निघेपर्यंत तिला चाबकाखालीं मारून नंतर तिला एका खांबाला बांधून ठेवली होती. व पुढें थोड्याच वेळानें ती मरण पावली. परंतु ह्या अपराधाबद्दल कोणालाही शिक्षा झाली नाहीं.

एकदां रानांतून जातांना एक बेलजिअन ऑफिसर वाट चुकला. ह्मणून जवळ असलेल्या दोघा नेटिव बायांना तो रस्ता विचारूं लागला. परंतु त्या त्याला आपल्या गांवाची वाट सांगेनात. तेव्हां त्या दोन्ही स्त्रियांचे स्तन त्यानें कापून टाकले.

एका मेजरच्या हातीं एकदां बारशे नेटिव लोक लागले. त्यांपैकीं त्यानें सव्वीस पुढारी निवडून त्यांना ठार मारून टाकलें. व दोघांना टांगून त्यांच्या डोक्याची कवटी एका डाक्टरनें सर्वांच्या समक्ष काढिली.

**चमत्कारिक ताप**—सामसेन जिल्ह्यांत एक चमत्कारिक जातीच्या तापाची साथ निघाली आहे. या तापास तिकडील लोक ' लिसन ' किंवा थरथर कापविणारा ताप असें ह्मणतात. हा ताप आला ह्मणजे मनुष्य सुमारे पांच दिवसपर्यंत थरथर कापूं लागतो, वं त्या अवधींत डोक्यावरील सर्व केंस गळून पडतात.

**अजोबाचें नातीशीं लग्न**- मद्रासकडे एका वृद्ध गृहस्थानें तीन बायका केल्या. त्यांपैकीं तिसरी बायको त्याच्या पहिल्या बायकोपासून झालेल्या मुलीची मुलगी आहे. तिचें वय २९ वर्षांचें असून तिच्या नवऱ्याचें—वस्तविक आजोबाचें—वय ९० वर्षांचें आहे व तिला एक दहा वर्षांचा मुलगा आहे. ही बायको ऐन ज्वानींत असल्यामुळें व तिला आपला म्हातारा नवरा विशेष आवडत नसल्यामुळें सदर म्हातारे बोवास तिच्या वागणुकीचा संशय येऊन त्यांनीं आपली सर्व मालमत्ता आपल्या दुसऱ्या बायकोस मिळण्यासंबंधानें तिच्या वतीच्या पक्षांच्या ताब्यांत दिली. त्यावरून ह्या तिसऱ्या बायकोनें आपल्यास व आपल्या मुलास मालमत्तेचा भाग मिळण्यासंबंधानें फिर्याद केली आहे.

**प्लेगाबद्दल**— प्लेगचा प्रसार विशेषतः पिसवांकडून होता असें मुंबईतील प्रयोग शाळेंत डा० लिस्टन एल्फिंस्टन यांनीं अनुभव घेऊन प्रसिद्ध केलें आहे. त्यांच्या अनुभवांत असें आलें आहे कीं, प्रथमतः पिसवांत प्लेगजंतू शिरतात व त्या पिसवा उंदरांस चावतात. एक उंदीर मेला ह्मणजे त्या दुसऱ्यास चावतात व त्या चावल्या ह्मणजे उंदरांस प्लेग होऊन ते मरण पावतात. उंदीर मिळाले नाहीं तर मग त्या माणसांस चावतात. व त्या योगें मनुष्यास प्लेगचा आजार होतो. ह्मणजे उंदीर आणि मनुष्य ह्या उभयतांचे दरम्यान पिसवांपासून प्लेगची वृद्धि होते.

**जपानी चाल**—जपानी मनुष्य आपल्या अपराधाबद्दल कैद भोगून बाहेर आला ह्मणजे त्यास गांवकरी लोक एक खाकसर पोशाख देतात, ( हा मुद्दाम गांवासाठीं करून ठेविलेलाच असतो. व हा कैद्याच्या पोशाखा सारखाच असतो. ) तो घालून घरोघरीं तो मनुष्य जातो व पुन्हां अपराध करणार नाहीं असें ह्मणून सर्वांची माफी मागतो.

चाळीस वर्षांपूर्वीं एका बाईच्या गुडघ्यात एक सुई शिरली होती ती इतक्या दिवसांनीं तिच्या उजव्या दंडांतून नुकतीच बाहेर पडली.

मार्कोनीची बिन तारेनें बातमी पाठविण्याची युक्ति उष्ण व कोरड्या हवेंत चांगलीशी सुसाध्य होत नाहीं, ह्मणजे बातमी दूरवर जात नाहीं असा अनुभव आला आहे. मग हिंदुस्थानातील रुक्ष हवेंत याचा उपयोग फारसा होणार नाहींसें दिसतें.